
# शिक्षक-पालक-विद्यार्थी

## शालेय विद्यार्थी, पालक व शिक्षक
## यांच्यासाठी उपयुक्त




: लेखक :

शिवश्री गोरख मोरजकर

शिवमती आशाताई मोरजकर

# आमचे श्रध्दास्थान




## कै. धोंडीराम (भाऊ) बळी मोरजकर

आदरणीय भाऊ जगत्‌गुरू संत तुकाराम महाराजांच्या विचाराचे पाईक होते. वृक्षवल्ली आम्हा सोयरे या अभंगाला अनुसरून भाऊ दर गुरूवारी पिंपळाच्या झाडाची पुजा करून जगत्‌गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे पठण करायचे. आदरणीय भाऊंच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत.

शिवमती आशाताई - शिवश्री गोरख धोंडीराम मोरजकर

## ।। आमचे अखंड उर्जास्त्रोत्र ।।



◇ दिपज्योती प्रकाशन क्रमांक : १

◇ शिक्षक–पालक–विद्यार्थी

– शिवश्री गोरख मोरजकर

– शिवमती आशा मोरजकर

◇ © सर्व हक्क सुरक्षित

◇ प्रकाशन

०६ जून २०२३ (छत्रपती शिवाजी महाराज ३५० वा राज्याभिषेक दिन)

◇ प्रकाशक व मुद्रक

दिपज्योती प्रकाशन

परंडा–सोनारी रोड, खानापुर पाटीजवळ,

पिंपरखेड, ता. परंडा, जि. धाराशिव

फोन नं. : ०२४७७ – २३२४२५

◇ E-mail : gdmorajkar@gmail.com

◇ पृष्ठसंख्या – ५२

◇ सेवामुल्य : ५०/– रूपये

विनंती : कृपया एकमेकांना ग्रंथ–पुस्तकेच भेट स्वरूपात द्या.

---

(या पुस्तकातील विचार लेखकाचे आहेत. प्रकाशक व मुद्रक त्यास सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद परंडा तालुका न्यायालयीन हद्दीतच राहतील. खाजगी वितरणासाठी.)

# शुभेच्छा

'शिक्षक-पालक-विद्यार्थी' या पुस्तक लेखनातून समाज उभारणीसाठी मूलभूत ठरणाऱ्या शिक्षक आणि पालक या आधारस्तंभावर लेखकांनी अत्यंत प्रभावीपणे प्रकाश टाकलेला आहे.

कोणत्याही क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी व्यक्तीची जडणघडण, बौध्दिक व भावनिक विकास तसेच व्यक्तिमत्व हे पायाभूत घटक ठरतात. या सर्व घटकांची जोपासना ही जन्मत: मुलांच्या पालकांकडून तर होतच असते, परंतु शालेय जीवनात मुलांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका महत्वाची आहे. पालक आपल्या मुलांकडे त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव झटत असतातच, परंतु शेकडो नव्हे तर हजारो मुलांच्या आयुष्याला दिशा देण्याची ताकद ही शिक्षकांमध्ये असते. हाच धागा पकडून लेखकांनी 'शिक्षक-पालक-विद्यार्थी' यांच्यातील अनुबंध अधिकाधिक दृढ होण्यासाठी अत्यंत सोप्या भाषेत आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'वळणाचे पाणी वळणावर जाते' अशी एक म्हण आपल्याकडे प्रचलित आहे. तर वळणाला खऱ्या अर्थाने दिशा देण्यासाठी पालक आणि शिक्षक यांनाही हे पुस्तक प्रभावीरित्या मार्गदर्शक ठरेल. हे पुस्तक प्रत्येक पालक, शिक्षक तसेच विद्यार्थी यांना निश्चितच वाचनीय आहे.

मी दोन्ही लेखकांना त्यांच्या या नविन पुस्तकासाठी मन:पुर्वक खुप खुप शुभेच्छा देते.

धन्यवाद...!

**रोहिणी नऱ्हे-विरोळे**
उपजिल्हाधिकारी, धाराशिव

# मनोगत....

आपण दररोज इतर घडामोडीवरती लिहितो परंतु विद्यार्थ्यांसाठीही काहीतरी लिहावे असे वाटले म्हणून हा सर्व अट्टाहास. भविष्य शोधून सापडत नाही ते घडवाव लागत त्याचप्रमाणे योग्य वेळी घेतलेला निर्णय आपले भविष्य उज्ज्वल करू शकतो. हाच विचार डोळ्यासमोर ठेवून आम्ही गेल्या २१ वर्षापासून शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी, भविष्यात तो आदर्श तसेच संस्कारक्षम व्यक्ती कसा होईल यासाठी योग्य धडे देत आलो आहोत, आणि आज त्याचे फळ म्हणजे आमचे हजारो विद्यार्थी स्वावलंबी झालेले आहेत. विविध कंपन्या तसेच शासकीय नोकरी, वेगवेगळे उद्योगांमध्ये आमचे विद्यार्थी यशस्वी झालेले दिसत आहेत. यशस्वी झालेल्या एखादा विद्यार्थी समोर आला की एवढा आंनद होतो की त्याची किमंत करता येत नाही.

पालकांना माझी विनंती आहे की मुलांना रेसचा घोडा बनवू नका त्याला जे आवडते ते करू द्या, त्याला मानसिक अपंग बनवू नका, त्याला त्याचे निर्णय घ्यायची संधी द्या, तो चुकत असेल तर त्याला त्याचा मित्र बनून मार्गदर्शन करा, त्याला दम देऊ नका, त्याला थोडे मनमोकळेपणाने जगु द्या, त्याला फक्त परिस्थितीची जाणीव करून द्या, परिस्थिती त्याच्यापासून लपवू नका, आपल्या दैनदिन प्रत्येक व्यवहारामध्ये त्याला सहभागी करुन घ्या, गावपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत सर्व शासकीय तसेच खासगी ऑफीसच्या कामकाजाची त्याला माहिती करून द्या.

बऱ्याच वेळा आपण त्याला टिव्ही बघू नको म्हणतो आणि आपण बघत बसतो, तंबाखूचे व्यसन वाईट आहे म्हणतो आणि आपणच त्याच्यासमोर खातो, मोबाईल खेळू नको म्हणतो आणि आपणच तासनतास मोबाईल खेळत बसतो त्यामुळे आपण अगोदर आपल्या स्वतःला चांगल्या सवयी लावून घ्या मग मुलांना आपोआप लागतील ; कारण मुल आपले अनुकरण करत असतात.

मुलांकडे लक्ष देण्याच्या वेळेत आपण मुलांसाठी संपत्ती कमवायच्या मागे लागतो आणि आपल इथच चुकत ! मुलांच्या लक्षात येते की बापानं भरपूर कमवून ठेवलय आपल्याला काहीच करायची गरज नाही, जास्त संपत्ती कमविण्यापेक्षा मुलांच्या करिअरकडे लक्ष द्या. संपत्ती चांगल्या मार्गाने कशी कमवायची असते हे त्याला लहानपणापासून धडे द्या. बघा तो आयुष्यात कधीच अयशस्वी होणार नाही आणि तो आदर्श व्यक्ती झाल्याशिवाय राहणार नाही. हे पुस्तक आपल्या हातात देताना खुप आनंद होत आहे ; कारण हे पुस्तक वाचल्यानंतर युवा पुढीला योग्य दिशा मिळणार आहे.

**- गोरख मोरजकर**

अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, परंडा.

# प्रस्तावना....

पालक-शिक्षक-विद्यार्थी या त्रिमुर्ती समोरील आव्हाने कशी पार पाडता येतील, या विषयीची छोटेखानी मार्गदर्शक पुस्तिकेची प्रत माझ्यासमोर चिकीत्सेसाठी उभी झाली.

शिवश्री. मोरजकर सरांनी एक आदर्श पालक म्हणून मला प्रस्तावना लिहिण्यासंबंधी सुचवलं. मी आपले उज्वल भविष्य घडवु पाहणाऱ्या मुलांना व त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे ठेवणाऱ्या पालकांच्या विचारांवरती मला माझे अनुभवी विचार मांडण्याची संधी मिळाली. मी देखील आनंदाने होकार दिला.

तसा विचार केला तर मी काही फार मोठा लेखक, साहित्यिक वैगेरे अजिबात नाही; परंतु माझी मुले घडविताना शिक्षणांत, नोकरीत, मित्र-मैत्रिणीसोबत, समाजासोबत सामाजिक बांधिलकी जोपासावी, थोरा-मोठ्यांचा आदर करावा, गुरू प्रती कृतज्ञता बाळगावी हे मी मुलांच्या मनावर बिंबवून यशस्वी बनवू शकलो. त्यामुळेच ती त्यांच्या शैक्षणिक करिअरमध्ये आणि सामाजिक जीवनामध्ये यशस्वी होऊ शकली.

सरांनी रविंद्रनाथ टागोरांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांविषयी विचार सांगितले आहेत. ते आजच्या पिढीतील पाल्य-पालकांना बोध घेणारे आहेत. जसे टांग्याचा घोडा डोळ्यांच्या बाजूला लावलेल्या झापडीनुसार सरळ चालतो. तसे आजच्या मुलांना करून जमणार नाही. नुसता अभ्यास करून जमणार नाही. चौफेर आणि अद्यावत ज्ञान ठेवावे लागेल. महत्वाचे म्हणजे योग्यवेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता अंगिकारावी लागेल.

पालक आपली अपूर्ण राहिलेली स्वप्ने मुलांकडून पूर्ण करू इच्छितात. अवाजवी अपेक्षा आणि समाजातील प्रतिष्ठेसाठी मुलांवर दबाव आणतात. त्यांच्या आवडीचा, मानसिकतेचा विचार न करता त्याला लंबी रेस का घोडा बनविण्याचा प्रयत्न करतात. परंतु चुकीच्या अट्टाहासामुळे हा घोडा कोणत्याच कामाचा राहत नाही, अगदी रेसच्या कामाचाही नाही.

क्षेत्र कुठलेही असो त्यांचे निर्णय त्यांना घेऊ द्या. आपली मते व्यक्त करा पण लादू नका. त्यांना आपली साथ द्या. मित्रासारखे खंबीरपणे पाठीशी उभे रहा. हाच संदेश सदरील पुस्तिकेतुन खुपच मार्मिक शब्दात सरांनी दिला आहे. यातील त्यांचे विचार, दाखले यांची मांडणी अनुभवी पालकांनाही करणे शक्य नाही. सदरील पुस्तिका वाचल्यानंतर आदर्श पालकांना हे स्वत:चे अनुभव आहेत हे मनोमन पटेल.

पालक-शिक्षक-विद्यार्थी यात त्रिमुर्तीवरच समाज आणि देशाचा विकास अवलंबून आहे. विशेष म्हणजे हे तीनही घटक एकमेकांशी पुरक आणि संबंधित आहेत.

१. अग्रक्रमाचे भान :- पालक (यशस्वी होण्यासाठी प्रथम व महत्वाची भुमिका)

२. प्रमाणाचे भान :- शिक्षक (यशस्वी होण्यासाठी काय करावे, कसे करावे.)

३. औचित्याचे भान :- विद्यार्थी (यशस्वी होण्यासाठी योग्य निर्णय कसा घ्यावा. )

सर आपण शैक्षणिक क्षेत्रात आहात. आपला आजवरचा अनुभव या पुस्तकातून सर्व समाजापुढे येत आहे. असेच शिक्षण क्षेत्रासाठी अपेक्षित असलेले शैक्षणिक संस्कार, पालकांचे कर्तव्य व विद्यार्थ्यांची दिशा या विषयी आपणाकडून अशीच उच्चतम दर्जाची शब्दशिल्पे निर्माण व्हावीत आणि त्यायोगे संस्कारक्षम पिढी घडावी अशी इच्छा बाळगतो, नव्हे तर खात्रीच बाळगतो !

आपलाच
**- महादेव सु. शिंदे**
पालक

# ..अणुक्रमणिका..


१) शिक्षण काय असतं ? १
२) आजच्या मुलांची मानसिकता १
३) शिक्षण कस असावं.. २
४) गरज पाल्य-पालक संवादाची व समन्वयाची... ३
५) पालकाच्या अपेक्षा व विद्यार्थ्यांची मानसिकता... ४
६) आजच्या पालकाची जबाबदारी ५
७) पालकांनो तुमच्या पाल्याला समजून घ्या ! ५
८) शालेय वयात मुलांच्या समस्या ६
९) मुलांसाठी चांगल्या सवयी ६
१०) मुले स्वावलंबी व्हावी असे वाटत असेल तर... ७
११) मुलांची सहनशिलता कशी वाढवावी... ७
१२) मुलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी पालकांची जबाबदारी.... ८
१३) मुलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी पालकांनी टाळा या गोष्टी ८
१४) मुलांना स्वत:ची जबाबदारी नाही समजली तर...? ९
१५) लहानपणापासून मुलांमध्ये आदर हवा... ९
१६) मुलांना पालकांचा वेळ हवा... १०
१७) आदर्श पालक १०
१८) पालक व विद्यार्थ्यांच्या मनावरील ताणतणाव ११
१९) पालक नेहमी स्वत:ची प्रतिमा जपत मुलांसोबत बोलतात ११
२०) ग्रामिण भागातील पालक आणि विद्यार्थी १२
२१) व्यक्ती तितक्या प्रकृती हे पालकांनी समजून घ्यायला हवे १२
२२) पालकांचा मुलांशी संवाद नसेल तर १३
२३) पालकांची मुलांप्रती निरपेक्ष भावना असावी १३
२४) आधुनिक तंत्रज्ञान व आजची मुले १४
२५) पालकांच्या अवास्तव अपेक्षा १५
२६) आधुनिक तंत्रज्ञानाच्या योग्य वापरासाठी मुलांना मार्गदर्शन हवे १५
२७) तंत्रज्ञानाचा गैरवापर टाळण्यासाठी... १६
२८) पालक म्हणून तुमची भुमिका १६
२९) मुलांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याची जबाबदारी कोणाची ? १७
३०) आईवडीलांनी आपल्या लेकरावर भरभरून प्रेम करावे १७
३१) मुलांचे मित्र व्हा आणि त्यांना आपले विचार कळू द्या १८
३२) पालकांनी मुलांच्या मनावर लहानपणापासूनच महामानवांचे विचार रुजवावेत १८
३३) विद्यार्थ्यांचा शिक्षकांप्रती भाव कसा असावा १९
३४) पुर्वीचा पालक-शिक्षक-विद्यार्थी १९
३५) आजचा पालक-शिक्षक-विद्यार्थी २०
३६) शिक्षण कायद्याचा गैरवापर २०
३७) मुलांच्या संस्काराबाबत आईची भूमिका महत्वाची २१
३८) आदर्श शिक्षक कसा असावा २१
३९) शिक्षण या प्रक्रियेत शिक्षक हा महत्वाचा घटक २२
४०) गौतम बुद्ध, संत नामदेव, संत तुकाराम महाराज हे आदर्श गुरूच(शिक्षक) होते २२
४१) कळयांचे फुलात रूपांतर करतो तोच शिक्षक २३
४२) आकाशाशी दोस्ती करायला शिकवतो तो खरा शिक्षक २३
४३) शिक्षक कसा असावा २४

४४) ग्रामीण शिक्षण व्यवस्था-शिक्षक-पालक २४
४५) आपल्या शिक्षकाप्रमाणे आपण असावं... २५
४६) शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांची प्रेरणाच... २५
४७) विद्यार्थी आपल्या शिक्षकाच्या विचारांवर मार्गक्रमण करीत असतो २६
४८) शिक्षक हा आजन्म विद्यार्थी असला पाहिजे .....विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.. २६
४९) बदलत्या तंत्रज्ञानाशी शिक्षकांनी जुळवून घेतले पाहिजे २७
५०) उपक्रमशील शिक्षक शाळेच भुषण असतात २७
५१) उपक्रमशील शिक्षकांचे कौतुक झाले पाहिजे २८
५२) केवळ शाळेच्या वेळेच्या चौकटीतच मी काम करणार २८
५३) अत्याधुनिक अध्ययन साधनांची आवश्यकता २९
५४) शिक्षकाने विद्यार्थ्याला वैचारिक स्वातंत्र्य दिले पाहिजे २९
५५) एकविसाव्या शतकाला सामोरे जाणारा शिक्षक २९
५६) मुलांच्या मनातील अंधश्रध्दा शिक्षक कमी करू शकतात ३०
५७) सावित्री-ज्योतीबांचे विचार फक्त शिक्षकच पुढे घेऊन जाऊ शकतात ३०
५८) पुर्वी शिक्षक हा केवळ शाळेचाच नव्हे तर गावाचा मार्गदर्शक होता ३१
५९) शिक्षकच नवीन समाजाची निर्मिती करू शकतो ३१
६०) ग्रामीणमधील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत ३१
६१) कुंपणापर्यंतचे शिकवायचे असेल तर शिक्षकाला क्षितिजापर्यंतचे ज्ञान असायला हवे. ३२
६२) आजच्या मुलांची अवस्था साहित्यांनी गच्च भरलेल्या पिशवी सारखी झाली आहे ३२
६३) मुलांवर चांगले संस्कार २१ वर्षापर्यंत केले जाऊ शकतात. ३३
६४) सत्य बोलणे, सत्य वागणे हे संस्कार मुलांमध्ये लहानपणापासून रुजवावे लागतात ३३
६५) आम्ही कसेही असू पण आमची मुले मात्र आदर्श असली पाहिजेत ३४
६६) आजची मुले कुटुंबीयांच्या अपेक्षेमुळे गुदमरून जात आहेत ३४
६७) एकाग्रता वाढविण्यासाठी एक प्रयोग ३५
६८) क्षमता एकाग्र सराव व सातत्य ३५
६९) मेंदूवरील ताण कमी करण्यासाठी... ३६
७०) अभ्यासाची छान सुरुवात करण्यासाठी... ३६
७१) बौद्धिक विभाजन नको... ३६
७२) ध्येय निश्चित नसेल तर कॅप्टन नसलेल्या जहाजाप्रमाणे आपली अवस्था होईल ३७
७३) मुलाच ध्येय पालकांनी निश्चित करू नये ३७
७४) १० वी नंतर पुढे काय..... ३८
७५) १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर विज्ञान(सायन्स) पर्याय निवडला तर... ३८
७६) आजचे विज्ञान उद्याच्या तंत्रज्ञानाचा आधार आहे ३९
७७) विज्ञान(सायन्स) शाखेसाठी क्रॉप सायन्स व कॉम्प्युटर सायन्स हा उत्तम पर्याय ३९
७८) १० वी नंतर कला(आर्टस्) किंवा वाणिज्य(कॉमर्स) ४०
७९) मुलांना लहानपणापासूनच वेगवेगळ्या क्षेत्राची ओळख करून दया ४०
८०) मुलांना 'स्पून फिडिंग' करू नका ४१
८१) मुलांशी चर्चा करा, मुलांचे गुण ओळखा ४१
८२) १० वी नंतर आयटीआय हा उत्तम पर्याय ४२
८३) विद्यार्थी ते परीक्षार्थी यामध्ये मुलांच बालपण हिरावून घेतलं जातय ? ४२
८४) शिक्षणाचा वापर जर व्यवहारात करता येत नसेल तर त्या शिक्षणाचा उपयोग शून्यच. ४३
८५) मुले खूप शिकली परंतु शिक्षण वापरायचे कुठे हेच समजले नाही... ४३
८६) विद्यार्थी हा राष्ट्राचा आधार स्तंभ असतो... ४४
८७) विद्यार्थी हा खूप महत्त्वाचा विषय आहे ४४

# शिक्षण काय असतं ?

रवींद्रनाथ टागोर काय म्हणतात पहा...

टागोरांची शांतीनिकेतन शाळा झाडांखाली भरत असे. पक्ष्यांची किलबिल ऐकू येई. एकदा टागोर झाडाखाली बसले होते. चार विद्यार्थी त्यांच्या समोर पुस्तकात डोक खुपसून बसली होती. आणि उरलेली बरीच मुले खेळत-बागडत होती. कोणी झाडावर चढला होता, कोणी फुलांचा सुगंध घेत फिरत होता. तेवढ्यात एक पालक तिथे आले. पाहतात तर काय गुरुदेव शांतपणे बसले होते आणि फक्त चार मुले पुस्तकात डोके खुपसून बसली होती व इतर मुले हसण्यात-नाचण्यात रमली होती. सुटा-बुटातील पालक महाशय टागोरांना म्हणाले- या नाचणाऱ्या-बागडणाऱ्या मुलांच्या भवितव्याची तुम्हाला चिंता वाटत नाही का? टागोर म्हणाले- चिंता वाटते, पण नाचणाऱ्या-बागडणाऱ्या मुलांची नाही तर पुस्तकात तोंड खुपसून बसलेल्या मुलांची. ही मुले खेळण्या-बागडण्याच्या वयात मोठ्या माणसांसारखी वागत आहेत. ही मुले लहान वयात प्रौढ झाली आहेत. प्रौढ तर मीसुद्धा अजून झालो नाही. खरं तर मलाही झाडावर चढावं असं वाटतं. पक्ष्यांशी बोलावंसं वाटतं. भरपूर खेळावंसं वाटतं. पण माझं शरीर आता साथ देत नाही. टागोर जगण्यासाठी शिकवत होते. आता शिकण्यासाठी जगावे लागते. जास्त ज्ञान, जास्त कला घेऊन मुले धावत असतात. आणि पालक त्यांच्यावर पैसे लावतात ! मग एक स्पर्धा सुरु होते आणि जगायचं राहून जातं... !! बघा चिंतन करा आपण आज काय करत आहोत.

## आजच्या मुलांची मानसिकता

आजच्या या मोबाईल व इंटरनेटच्या जमान्यात खेळ, व्यायाम, भटकंती आणि दर्जेदार वाचन न केल्यामुळे मुलांमध्ये मानसिक कमतरता जाणवते. मित्र फक्त Whatspp, facebook वर भेटतात. प्रत्यक्ष भेट नाही. सुख-दुःखाची देवाण- घेवाण नाही आणि मित्राचा- मैत्रिणीचा मानसिक आधार नाही. आणि त्यामुळे team work कळत नाही. दिलखुलास हसणे आणि ओक्साबोक्शी रडणे मानसिक आरोग्यासाठी चांगले असते. ह्या दोन्ही क्रिया मुलांना करता येत नाहीत. पालकांच्या आजच्या भुमिकेमुळे मुलांना संघर्ष माहीत होत नाही. त्यामुळे आपोआपच, जरा मनाविरुद्ध घडलं की लहान मुले-मुली आत्महत्या करतात. बरीच एकुलती एक मुले दुसऱ्याशी जमवून घेण्याची सवय नसल्यामुळे पुढे लग्न झाल्यावर वर्षभरात घटस्फोट घेतात. ज्या मुलांना बहीण नसते, चांगली मैत्रीण नसते त्यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन संकुचित बनतो. ह्या उणिवांचा शिक्षणात विचार केलेलाच नाही. भारतीय शिक्षण पद्धत सर्वांगीण नाही हे शिक्षण तज्ज्ञ सांगत आले आहेत. एखादी स्त्री गरोदर राहिली तर जन्माला येणाऱ्या जीवाच्या admission ची तयारी सुरु होते. कृष्णाला जन्मण्याआधी मारायची तयारी मामाने केली होती. आता मुल जन्माला येण्याआधी त्याला रेसचा घोडा बनवायची तयारी सुरु होते. आता मुलाने बोलायला सुरुवात केली की थेट E =MC square म्हणायचं बाकी राहिलं आहे.

# शिक्षण कस असावं..

आजच्या शैक्षणिक वातावरणातील मुले सर्व Formula पटापट म्हणून दाखवतील पण स्वतःचा Formula कधीही शोधू शकणार नाहीत. Guitar शिकतील पण स्वतःची संगीत रचना करू शकणार नाहीत. लता मंगेशकर, सचिन तेंडूलकर, मेरी कोम ह्यांच अनुकरण अचूक करतील. पण स्वतःची ओळख निर्माण करणार नाहीत. कारण सध्या आपण त्यांना फक्त अनुकरण करायला शिकवत आहोत. जगायची कला, गीत–संगीतातीलआनंद, निसर्ग संपदेची भव्यता, नव्या संकल्पनांची निर्मिती, जुन्या विचारांचा आधार, साहित्य ह्याला बाजारू किंमत नसल्यामुळे फक्त जे विकलं जातं तेच ज्ञान मुलांना मिळतंय, त्यात ते पारंगत होत आहेत. काही जणांना campus मध्ये दर महिना ४ लाखांपेक्षा जास्त पगार असणारी नोकरी मिळतेय.पण त्यात देशाचं नाही, भांडवलदारांच हित साधला जातंय. पुढची पिढी मोठी पदवी मिळवेल पण न स्वतः जगण्याचा आनंद लुटू शकतील, न दुसऱ्याला जगण्याची मजा मिळू देतील.

अगदी हाच धोका ओळखून जपानमध्ये शाळेत A/C लावत नाहीत. तिथे मुलांना घोकंपट्टी पेक्षा Practical वर भर देतात. वृक्ष–वेली स्वतःच अन्न स्वतः तयार करतात त्या प्रक्रियेला काय म्हणतात? असे प्रश्न विद्यार्थ्यांना न विचारता शाळेत व बाहेर भाजी लावायला शिकवतात. त्या रोपांची– वेलींची जोपासना करायला लावतात. प्रॅक्टीकल मधून मुलांना मिळालेल उत्तर त्यांच भविष्य उज्ज्वल करू शकते.

आपल्याकडे मुलांच्या मानसिकतेचा विचार केला जात नाही, मित्राचा मुलगा एमबीबीएस गेला म्हणजे माझाही एमबीबीएसलाच गेला पाहिजे असा पालकांचा अट्टाहास असतो त्याठिकाणी आपल्या मुलाला कोणत क्षेत्र आवडत व त्याचा पात्रतेचा विचार केला जात नाही. त्यामुळे मुले इच्छा नसताना पालकांच्या हट्टामुळे नको असलेले क्षेत्र निवडतात व पुढे निराश होताना दिसतात.

आपण जर जर्मनीसारख्या देशाचा विचार केला तर जर्मनीमध्ये मुलांना Transference शिक्षण दिले जाते. लहान मुलांची बोटे नाजूक असतात हे लक्षात घेऊन दुसरीपर्यंत लेखन करू देत नाहीत. पाचवीपर्यंत Practical चालतं आणि त्यानंतर विद्यार्थी बँक कर्मचारी बनेल की हवाई सेविका, प्रशासन सांभाळेल की कुशल कामगार होईल, तो कोणत्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो ह्याची सतत तपासणी होते. दहावीनंतर फक्त त्याला आवडणाऱ्या क्षेत्राचं प्रशिक्षण दिले जाते. तेथे सगळे एकदम science ला किंवा Art ला जात नाहीत. तेथे अनावश्यक विषय शिकवत नाहीत.

प्रत्येक विद्यार्थी उद्या देश चालवणार ह्याचा विचार Netherlands सारखा देशही करतो. एकाच विद्यार्थ्यावर सगळ्या विषयांचा मारा करत नाहीत. चारी दिशांनी अनेक विषय आणि क्लासचा मारा सोसण्याचे काम फक्त भारतीय विद्यार्थ्यांना करावे लागते.

माझी पालकांना विनंती आहे की काळाची पावले ओळखून आपण आपल्या मुलांच्या भविष्याबाबत...विचारपूर्वक निर्णय घेतला पाहिजे.

# गरज पाल्य-पालक संवादाची व समन्वयाची...

विद्यार्थ्यांच्या पौगंडावस्थेतील नाजूक काळातच दहावीचे वर्ष नेमके येते. त्यामुळे या काळात मुलांमध्ये मानसिक व शारीरिक अशा दोन्ही स्तरांवर बदल होत असतात. अशा वेळी स्वत:ला उत्तम मार्क पाडून सिद्ध करण्याचे दडपण मुलांवर नकळत येते. त्यामुळे मुलांशी योग्य पद्धतीने संवाद साधणे व त्यांना समजून घेणे, खरे तर ही जबाबदारी पालकांचीच आहे, असे मला वाटते.

दहावीत मिळालेले यश किंवा अपयश किंवा जरी कमी मार्क मिळाले असतील तरी, हे नॉर्मल मानले पाहिजे. पुढे आयुष्यात मुलांना चुका सुधारून आपली प्रगती करण्याची संधी आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे. तशी सकारात्मक ऊर्जा व प्रोत्साहन मुलांना दिले गेले पाहिजे. त्यासाठी आधी आपली मनोधारणा, आपले विचार तपासून पाहिले पाहिजेत.

पुढे येणाऱ्या जुन महिन्यात इयत्ता १० वीच्या निकालानंतर कुठली शाखा निवडावी, यामध्येदेखील पालक व मुलांमध्ये एकमत असावे. विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी, व्यक्तिमत्त्व, कार्यक्षमता, त्याच्यामधील प्रॅक्टिकल इंटेलिजन्स, अभ्यासक्रमाची उपयुक्तता अशा अनेक गोष्टींचा सारासार विचार करूनच शाखा निवडावी. करिअर कौन्सेलरची मदतही वेळप्रसंगी जरूर घ्यावी. शिक्षणानंतर कुठले काम करायला त्याला आवडेल, याचाही जरूर विचार व्हावा.

आपला पाल्य युनिक म्हणजेच एकमेवाद्वितीय आहे, हे पालकांनी लक्षात घ्यावे. त्यामुळे इतरांशी त्याची तुलना करणे टाळावे. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यासाठी तुम्ही त्याचे मित्र व मेंटॉर(समुपदेशक) किंवा मार्गदर्शक बनणे अपेक्षित आहे. आपण मुलाचे पालक आहोत मालक नाही, याचे भान ठेवावे.

मला खात्री आहे, की वरील टिप्स पालक व मुलांमधील संवाद वाढण्यास नक्कीच उपयुक्त ठरतील. त्यामुळे साहजिकच दोघांचे नाते दृढ व सक्षम होईल.

"जोपर्यंत चांगले शिक्षण घेणे म्हणजे चांगली नोकरी लागणे,
ही संकल्पना पालक आणि विद्यार्थ्यांच्या डोक्यातून निघत नाही
तोपर्यंत समाजात नोकरच जन्माला येतील, मालक नाही."

– भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

# पालकाच्या अपेक्षा व विद्यार्थ्यांची मानसिकता...

फार पूर्वी काळापासून शिक्षण तज्ञ सांगत आले आहेत की मुलांवर कोणतंही दडपण न टाकता त्यांना हसत खेळत शिक्षण घेऊ द्या, तसेच मुलांच्या मानसिकतेचा विचार करून त्याचा कल कोठे आहे त्या दिशेने त्याला शिक्षण द्या, मला वाटते त्यासाठी मागील काळात शासनाने मुलांसाठी कलचाचणीही ठेवली होती परंतु त्याकडेही बरेच पालक दुर्लक्ष करताना दिसत आहेत. माझी पालकांना नम्र विनंती आहे की आपल्या मुलामुलींचा कल पाहुनच प्रवेश घ्यावा नाहीतर बऱ्याच वेळा मुलं पालकांच्या हट्टापाई त्यांना नको असलेल्या क्षेत्रात प्रवेश घेतात आणि मग पुढे अपेक्षीत यश मिळत नाही, त्यामुळे बरीच मुले निराश होताना दिसतात.

योग्य क्षेत्र निवडण्यासाठी पालकांनी प्रत्येक शैक्षणिक क्षेत्राची मुलांना माहिती करून देणे आवश्यक आहे. मेडीकल म्हणजेच सर्वस्व नाही किंवा इंजनिअरींग म्हणजेच सर्वस्व नाही यापेक्षाही जास्त स्टेटस आणि पगार मिळवून देणारे क्षेत्र आहेत. हुशार मुलं ज्या क्षेत्रात जातील तेथे ती चमकल्याशिवाय राहणार नाहीत, म्हणून मुलांच्या आवडीनुसार युपीएससी, एमपीएससी, प्रोफेसर, ॲग्री किंवा एखादा उद्योग व्यवसाय मुलांना करू द्या. त्यासाठी मुलांना नेहमी सकारात्मक बोला, मुलांसोबत नेहमी सकारात्मक चर्चा करा. बऱ्याच वेळा काय होत की मुले पालकांच्या अपेक्षेप्रमाणे प्रवेश घेतात व पुढे दोन तीन वर्ष प्रयत्न करून यश नाही मिळाले की नाराज होतात आणि परत दुसरे क्षेत्रात प्रयत्न करायाचा म्हटले की उशीर झालेला असतो काही मुल यातून सावरतात; परंतु काही मुलांना यामधून सावरणे जड जाते मग नको असलेले मार्ग निवडतात.

मी सर्वांना सांगू इच्छितो की समाजामध्ये वावरताना पैसा हे सर्वस्व नाही, पैशानी सर्वच कामे होतात असे नाही, हे पालकांनी समजावून घेणे आवश्यक आहे. आजची परिस्थिती पाहता ज्यांच्याकडे पैसा जास्त आहे त्यांना शांत झोप लागत नाही आणि ज्यांना जेमतेम पैसा मिळतो त्या लोकांना शांत झोप लागते.

पैसा तर जीवनात आवश्यक आहेच परंतु पैशासोबत माणसाकडे माणुसकी असायला हवी, माणुसकी असल्याशिवाय माणसे जोडली जात नाहीत आणि माणसे जोडल्याशिवाय तुमची एक वेगळी इमेज तयार होत नाही.

म्हणून माझी आजच्या तरुण मुलामुलींना विनंती आहे की पैशावाला तर कोणीही होऊ शकतो परंतु आदर्श व्यक्ती म्हणून ओळख निर्माण करणे पैसे कमविण्याइतके सोप नाही. त्यामुळे प्रत्येक पालकांनी माझा मुलगा आदर्श व्यक्ती कसा बनेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

# आजच्या पालकाची जबाबदारी

आजच्या बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये आपल्या पाल्याकडे आवश्यक तितके लक्ष देता येत नाही आणि आजच्या या बिघडलेल्या परिस्थितीमध्ये आपल्या मुलावर वाईट संस्कार होण्याची प्रत्येक पालकाच्या मनात भीती आहे. मुलावर संस्कार करणारी प्रथम आईच असते. तिच मुलांवर संस्कार करते व मुलही नकळत आईचे संस्कार उचलतात.

सामाजिक परिस्थिती बदलत असली तरीही आपल्या बाळावर संस्कार होण्याच्या दृष्टीने आई-वडिलांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. सिगारेट ओढणाऱ्या आपल्या वडिलांना पाहून छोट्या बाळाला काय वाटत असेल. निष्पाप जीवाला खरेखोटे काहीच समजत नसते, त्याला खोटे बोलायला किंवा आचरण करावयाला आई व वडीलच अप्रत्यक्ष शिकवत असतात तसेच मुलासमोर आई-वडील भांडू लागले की त्याचा विपरीत परिणाम मुलांवर होतो. छोट्या बाळाचे घरातील आराध्य दैवत आई वडील असतात जगात जे काही ज्ञान आहे ते आपल्या आईवडिलांच्याच जवळ आहे अशी त्याची गोड समजूत झालेली असते. या चिमुकल्या ने शाळेत पहिले पाऊल टाकले म्हणजे त्याच्या चिमुकल्या जीवनात तिसरी आदर्श व्यक्ती प्रवेश करीत असते ती म्हणजे त्याचे शिक्षक अगर शिक्षिका. या तिघांच्या वरील त्यांच्या निष्ठेच्या भावनेला तडा पडू न देण्यासाठी खबरदारी पालकांनी व शिक्षकांनी घ्यायलाच हवी.

# पालकांनो तुमच्या पाल्याला समजून घ्या !

प्रत्येक मातापित्याच्या आपल्या मुलांकडून बऱ्याच अपेक्षा असतात आणि ते साहजिकही आहे; पण त्याच वेळेला आपल्या मुलाच्या क्षमतेविषयी आपण अवास्तव अपेक्षा तर ठेवत नाही ना याचाही विचार करावा लागतो. या मर्यादांचे योग्य ते भान ठेवले नाही, तर मातापित्यांचा अपेक्षा या मुलांना न पेलणारे ओझे बनते.

मुलाला शाळेत घातले म्हणजे त्याने अभ्यासात आघाडीवरच असले पाहिजे, असा पालकांचा आग्रह असतो. माझ्या मुलाने अभ्यासासह खेळातही अव्वल असले पाहिजे. त्याला एखादी कला आली पाहिजे. याप्रमाणे पालकांच्या अपेक्षांचे ओझे संपत नाही. ते पेलताना मुलांची चांगलीच तारांबळ उडते. आपले मुल वर्गात इतर मुलांच्या तुलनेत मागे पडते, हे लक्षात आल्यावर पालकांना धक्का बसतो. मग प्रश्न पडतो की आम्ही दोघे तर किती हुशार आहोत. मग आमचा मुलगा मठ्ठ कसा असेल ? साध्या साध्या प्रश्नांची उत्तरे देणे त्याला का जमत नाही ? त्यानंतर पालक विचार करतो की त्याला एखादा जादा क्लास लावावा का ? लावला तरी काही हरकत नाही परंतु त्याअगोदर मुलाचा बुध्यांक तपासा व मुलाला पेलेल एवढच ओझ द्या; नाहीतर त्याच्या मनावर विपरीत परिणाम होतील.

# शालेय वयात मुलांच्या समस्या

शाळेत काही मुले अभ्यासात मागे पडत असल्याचे निदर्शनास येते. काही विशिष्ट गोष्टी समजून घेण्यात या मुलांना वारंवार अडचणी येतात. वर्गात लक्ष एकाग्र करणे कठीण जाते. त्याच त्याच चुका ही मुले पुन्हाःपुन्हा करतात. अशावेळेस त्या मुलांच्या समस्या काय आहेत हे जाणून घ्यावे लागते. त्या मुलांच्या एखाद्या समस्येवरून त्याला नकारात्मक न बोलता त्या मुलांच्या काही विशेष गरजा आहेत का हे पालकांनी व शिक्षकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. वेळेत आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास अशी मुले कुठेही मागे पडत नाहीत. परंतु त्याची मानसिकता जाणून न घेताच आपण न्यायाधीश असल्यासारखे लगेच ठरवून टाकतो की तु अभ्यासात हुशार नाहीस, तु सध्याच्या स्पर्धेत टिकणार नाहीस असे नकारात्मक बोलून त्याला हिणवत राहतो आणि मग या लहान कोवळ्या मनावर त्याचा विपरीत परिणाम होऊन त्या मुलाचे आयुष्य दिशाहीन होते.

आयुष्यात काही करण्याची जिद्द असेल तर सगळ्या परिस्थिती तुम्ही बदलू शकता हे लहानपणापासूनच मुलांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करा

# मुलांसाठी चांगल्या सवयी

मुलांना चांगल्या सवयी लावायच्या असतील तर त्यामध्ये सातत्य हवे. मुलांनी चुकीच्या गोष्टी केल्या म्हणजे आपण त्यांना रागवतो, पण त्यांनी काही चांगल्या गोष्टी केल्या की त्याचं बक्षीसही त्यांना लगेच मिळालं पाहिजे. बक्षीस म्हणजे कुठली महागडी वस्तूच त्यांना आणून दिली पाहिजे असं नाही किंबहुना तसं करूही नये. पण मुलांच्या चांगल्या वागणुकीबद्दल शाबासकी देऊन त्याला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. तसेच आपलं मूल शाळेतून आल्यावर त्याच्याजवळ बसून शाळेत आज काय काय झालं, तो काय शिकला हे त्याला विचारलं पाहिजे. आपण जे काही करतोय, त्यात आपल्या पालकांना रस आहे हे मुलांनाही कळलं पाहिजे. आपल्या मुलांचे मित्र कोण आहेत, कसे आहेत, घराबाहेर मुलगा काय करतो, यावर अगदी पाळत नाही ठेवली तरी आपलं मूल घरात आणि घराबाहेर काय करतं याकडे पालकांचं सकारात्मक लक्ष असलं पाहिजे.अशा काही गोष्टी केल्या तर मुलांना नक्कीच चांगल्या सवयी लागू शकतील.

> "स्वप्न ते नव्हे जे झोपल्यानंतर पडतात,
> खरे स्वप्न ते असतात जे तुम्हाला पूर्ण केल्याशिवाय झोपुच देत नाहीत."
>
> – भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

# मुले स्वावलंबी व्हावी असे वाटत असेल तर...

आपल्या मुलाने स्वावलंबी व्हावे असे वाटत असेल तर त्याला काही बेसिक गोष्टी शिकवायला हव्यात. यात त्याने स्वत:ची कामे स्वत: केली पाहिजे उदा. सकाळी उठल्यानंतर स्वत:चे अंथरून काढून घड्या घालून ठेवणे, स्वत:च आंघोळीला पाणी घेणे, आईला इतर कामात मदत करणे, पाहुणे आल्यानंतर त्यांना चहा देणे, जेवायला वाढणे, भाजीपाला आणणे इत्यादी कामाची सवय मुलाला अगदी लहानपणापासूनच लावायला हवी म्हणजे तो मोठ्यापणी बेफिकीर होणार नाही व स्वत:सह इतरांची काळजी घेईल. त्याला काही हवे असल्यास स्वत: उठून घेईल. एखाद्या वेळेस आईवडील नसताना जर पाहुणे आले तर तो स्वत: पाहुण्यांना चहा करून देईल. नंतर बाहेर शिक्षणासाठी एकटा राहू लागल्यासही स्वत:ची काळजी स्वत: घेऊ शकेल.

जर आपण मुलांना लहानपणापासूनच काहीच काम करू दिले नाही तर तो त्याच्या आयुष्यात पाय असून पांगळा होईल आणि याला जबाबदार पुर्णत: पालक असतील.

# मुलांची सहनशिलता कशी वाढवावी...

मुलांची सहनशिलता वाढविण्यासाठी सगळ्यात प्रथम लहानपनापासूनच मुलाचे वेळेत हट्ट पुरवणे वेळीच बंद करावे. मुलाने एखादी गोष्ट मागितली की लगेच न देता, त्याला थोडी वाट पहायची सवय लावा. अपेक्षीत गोष्टीसाठी त्याला थोडा वेळ रडू द्या म्हणजे त्याची सहनशिलता आपोआप वाढेल.

आजच्या या धकाधकीच्या जीवनात मुलांची मानसिकता कमकूवत होत चाललेली आहे. मागितलेली गोष्ट जर वेळेत मिळत राहिली तर बऱ्याच मुलांची नकारात्मक गोष्टी पचविण्याची क्षमता कमी होते व पुढे चालून एखादी गोष्ट वेळेत नाही मिळाली तर नकारात्मक विचारातून मुलांच्या हातून आत्महत्येसारख्या अनपेक्षित घटना घडतात.

मुलांना आपल्या रागावर नियंत्रण मिळवायला शिकवा. प्रत्येक आई वडिलांनी आपल्या मुला/मुलीची मित्र/मैत्रिण बनून त्यांना विश्वासात घेऊन योग्य मार्गदर्शन केल्यास तो एक चांगला आदर्श माणूस म्हणून मोठा होईल आणि त्याचा तुम्हालाच काय तर सर्व समाजाला अभिमान वाटेल.

> "प्रवाहाच्या विरूध्द दिशेला तेच पाहू शकतात,
> ज्यांचे निर्धार ठाम असतात. ज्यांना कुठलेतरी उद्दिष्ट गाठायचे असते."
> – क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले

# मुलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी पालकांची जबाबदारी....

अनेकदा लहान मुलांमधील आत्मविश्वास (Confidence) कमी असल्याचं पाहायला मिळतं. चारचौघात मुलं गेल्यावर ते बोलताना लाजतात किंवा घाबरतात. म्हणूनच, मुलांमधील आत्मविश्वास वाढवण्यासाठी पालकांनी कोणत्या गोष्टी कराव्यात व कोणत्या टाळाव्यात ते पाहुयात.

मुलांनी कोणतीही नवीन गोष्ट केली किंवा त्यांनी एखादा नवा प्रयोग केला तर पालकांनी मुलांचं कौतुक केलं पाहिजे. असेच नवनवीन प्रयोग मुलांनी करावेत यासाठी त्यांना प्रोत्साहन दिलं पाहिजे. तसेच मुलांचे कौतुक सर्वांसमोर केल पाहिजे व चुका एकांतात समजावून सांगितल्या पाहिजेत. परंतु, अनेकदा मुलांनी कोणताही नवा प्रयोग केला की प्रथम पालकच मुलांची खिल्ली उडवतात तसेच सर्वांसमोर मुलांची तक्रार करतात त्यामुळे मुलांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम होतो. अशा घटना सतत घडत राहिल्या की मग मुलं यातून डिप्रेशनमध्ये जातात. बऱ्याच वेळा मुलांनी हट्ट केल्यावर अनेक पालक त्यांना मारतात किंवा ओरडतात. परंतु, मुलांना मारण्यापेक्षा त्यांना प्रेमाने समजवा. अमूक गोष्ट केल्यामुळे काय होईल किंवा ती गोष्ट आता गरजेची आहे का हे नीट त्यांना पटवून सांगा.

मुलांचा व्यक्तिमत्व विकास होत असताना त्यांना पाठिंबा देण अत्यंत महत्त्वाचं आहे.

## मुलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी पालकांनी टाळा या गोष्टी

मुलांना जन्म देणं व त्यांचं पालनपोषण करणं इतक्यावरच पालकांचं कर्तव्य संपत नाही तर त्यांना समाजातील जबाबदार नागरिक बनवणं हेदेखील पालकांचं कर्तव्य आहे.

- मुलांची तुलना इतर मुलांसोबत करू नका.
- खासकरुन मार्क्स किंवा इतर ॲक्टीव्हिटीची तुलना आवर्जुन होत असल्याचं पाहायला मिळतं.
- सतत चुका शोधू नका, लहान मुलं अनेक चुकांमधूनच शिकत असतात. त्यामुळे त्यांच्याकडून एखादी चूक झाली तर त्यांना ओरडण्याऐवजी नीट समजावून सांगा.
- लहान मुलांसमोर पती पत्नीमधील भांडण टाळा.
- मुलांसमोर खोट बोलू नका.
- मुलांसमोर दुसऱ्याला कमी लेखू नका.
- मुलांसमोर कोणतेही व्यसन करू नका.
- मुलांसमोर दुसऱ्यावर टिका करू नका.
- मुलांसमोर नकारात्मक बोलू नका.

पालकांच्या चुकीच्या वर्तनामुळे मुलांमधील नकारात्मकता वाढीस लागते. त्यातूनच मग मुले चिडचिड करु लागतात व पुढे मग काही रागीट बनतात तर काही डिप्रेशन मध्ये जातात.

# मुलांना स्वतःची जबाबदारी नाही समजली तर...?

बरीच मुलं जेव्हा मोठी होतात आणि शिकण्यासाठी किंवा नोकरीसाठी आईवडिलांपासून वेगळी राहायला जातात तेव्हा त्यांना जीवनातल्या समस्यांना यशस्वीपणे तोंड देता येत नाही. कारण त्यांच्या आईवडिलांनी याआधी त्यांना पैशाचा सुज्ञपणे वापर करायला, घर चालवायला किंवा रोजच्या लहानमोठ्या जबाबदाऱ्या हाताळायला शिकवलेलं नसतं. तात्पर्य हेच, की मुलांना लहान असतानाच जबाबदार व्यक्ती बनायला शिकवलं तर मोठं झाल्यावर आपण काय करावं हे त्यांना स्वतःहून कळेल.

मुलं सज्ञान होईपर्यंतच एकट्याने जगाचा सामना कसा करावा हे आईवडिलांनी शिकवणं अपेक्षित आहे.

## लहानपणापासून मुलांमध्ये आदर हवा...

आज मुल आई वडिलांना विचारत नाही व आई वडील मुलांना बोलायला गेल्यास त्यांचा अपमान केला जातो, गुरु शिष्याचे नाते जपले जात नाही, याला फक्त विद्यार्थीच जबाबदार नाहीत तर पालक व शिक्षक तेवढेच जबाबदार आहेत.

मुलं मोठ्यांचं अनुकरण करतात आणि त्यातून शिकतात. आदर कृतीमधून दिसू द्या. त्यासाठी फक्त पाया पडून उपयोगाचे नाही. आपण बसलो आहोत, तिथे कोणी मोठी व्यक्ती आली तर पटकन उठून त्यांना बसायला जागा करुन द्यावी, मोठ्यांसोबत जेवायला बसावं, ते काय बोलत आहेत ते मन लावून ऐकावं, त्यावेळी मोबाईल बघत बसू नये इत्यादी गोष्टी जाणीवपूर्वक कराव्यात.

मोठ्यांचा आदर करायचा असतो हे आजच्या पिढीला माहीत नाही ! गुगल बघता येते म्हणजे आपण सर्वज्ञ झालो आहोत या भ्रमात ही पिढी आहे ! हे खूप कटू वाटेल पण हे सत्य आहे ! अर्थात काही तरुण/ तरुणी याला अपवाद आहेत ! ते पूर्ण संस्कारी आहेत ! पण दुर्दैवाने ही संख्या फार कमी आहे.

"शिक्षणाशिवाय शहाणपण हरवले; शहाणपणा शिवाय नैतिकता गमावली;
नैतिकतेशिवाय विकास हरवला; विकासाशिवाय संपत्ती हरवली;
संपत्ती नसताना शूद्रांचा नाश झाला,
शिक्षणाच्या अभावामुळे बरेच काही घडले."

– क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले

# मुलांना पालकांचा वेळ हवा...

आज सर्वच पालक नोकरी-व्यवसाय करणारे आहेत. आई आणि बाबा असे दोघेही जर काम करणारे असतील, तर मुलांसाठी देण्याचा वेळ कमी होत जातो आणि नेमका मुलांना आपल्या पालकांचा वेळच हवा असतो. हा वेळ देताना पालकांची दमछाक होत असते. संध्याकाळी घरी आल्यानंतर मुलं आपल्या पालकांना खूप काही सांगायचा प्रयत्न करतात. मुलं तशी सुरुवातही करतात; परंतु पालकांच्या प्रतिक्रिया पाहून त्यांचे प्रश्न आणि सांगणे थांबते.

आई-बाबा आपले म्हणणे नीट ऐकत नाहीत. फक्त हो हो करत आहेत, हे त्यांना जाणवते आणि मग संवाद कमी होऊन मुले नाराज होतात. साहजिकच या गोष्टीचा परिणाम मुलांच्या मानसिकतेवर होतो व मुले पालकांपासून दुरावतात.

मुलांकडून दिवसभारातील वृतांत लक्ष देऊन ऐकणे व त्यावर त्याचा मित्र बनून मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे. पालक जर मुलांना वेळच देत नसतील तर मुलं आपल मन मोकळ करण्यासाठी मित्र शोधतील व भविष्यात त्याचा परिणाम संपुर्ण कुटुंबावर होईल.

## आदर्श पालक

जो स्वत:च्या मुलाला त्याच्यातील दोष घालवून त्याच्यात सदगुण आणण्यासाठी प्रयत्न करतो तोच खरा आदर्श पालक.

सध्याची पालकाची व्याख्या काय ? जास्तीत जास्त महागडे कपडे घेणे, मुलांना हवे ते खायला देणे, तसेच महागडे खेळणी घेऊन देणे, नको ते लाड पुरवणे म्हणजे पालकाचे कर्तव्य संपले. परंतु यामुळे आपण आपल्या मुलाला भोगी बनवत आहोत. भोगी व्यक्ती अनेक दोषांना जन्म देते. तर त्यागी व्यक्ती सदगुणांना जन्म देते. तेव्हा पालकांनी अंतर्मुख होऊन विचार करायला हवा की, मी मुलाला खरोखरच योग्य संस्कार देत आहे का ? एखाद्या जीवाला सदगुणी करून त्याचे जीवन आंनदी करणे हाच पालकाचा धर्म. आंनदी पालकच आनंदी पिढी घडवू शकतो. पाल्यावर संस्कार करण्यासाठी पालक आणि पाल्य यांच्यात सुसंवाद असायला हवा. स्वत: तणावमुक्त असलेले पालकच आपल्या मुलांना तणावमुक्त जीवन जगायला शिकवू शकतात. तणावग्रस्त पालकांना मुले आपल्या कल्पना, विचार किंवा समस्या सांगत नाहीत.

> "आपल्या प्रत्येकाकडं समान बुद्धिमत्ता नसते,
> पण ती विकसित करण्याची संधी मात्र सर्वांना समान मिळते."
>
> – भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

# पालक व विद्यार्थ्यांच्या मनावरील ताणतणाव

सतत भुतकाळात वावरणारे पालक मुलांशी सुसवांद साधू शकत नाहीत. मुले सतत वर्तमान काळात जगतात म्हणून ती सतत आंनदी असतात. पालक मात्र जीवनात घडलेले अनेक नकारात्मक प्रसंग आणि घटना सतत आठवत राहतो व त्यामुळे मनावर ताण येतो. आपले वडील काहीतरी टेन्शन मध्ये आहेत हे मुलांच्या लक्षात येते साहजिकच मुले पालकांजवळ आपले मत मांडायला घाबरतात. त्यामुळे पालकांनीही वर्तमान काळात जगायला शिकले पाहिजे. तणावग्रस्त पालकांच्या नकारात्मक बोलण्याने मुलांच्या मनावर घाव होतात आणि मनावर झालेले घाव आपण भरून काढू शकत नाही. त्यामुळे ताणतणाव दूर ठेवून पालकांनी मुलांशी सतत सकारात्मक बोलायला हवे, आपल्या बोलण्यातून मुलांना प्रोत्साहन मिळायला हवे.

तसेच पालकांनी आपल्या चुका मुलांसमोर मान्य करायला हव्यात, यामुळे मुलांच्या मनात आदराचे स्थान निर्माण होते व आपला प्रामाणिकपणा पाहून मुलेही प्रामाणिकपणे चुका मान्य करायला शिकतात व यामुळे मनावरील ताण कमी होण्यासाठी मदत होते.

# पालक नेहमी स्वतःची प्रतिमा जपत मुलांसोबत बोलतात

मुलांना बोलताना पालकांनी स्वतःला विसरून बोलायला पाहिजे म्हणजे मी आधुनिक वैद्य आहे, मी अभियंता आहे, मी अधिकारी आहे ही प्रतिमा जागृत ठेवून बोलण्याने पालक आणि मुले यांच्यात सुसंवाद कदापी होणार नाही. उलट पालकांना ताण येतो आणि मुले ऐकत नाहीत. आपली इतर पद सोडून पालक या भुमिकेत येऊन मुलांशी सहजतेने बोलायला हवे. व्यवहारातील प्रतिमा ठेवून मुलांसोबत बोलणे म्हणजे ताण व मुलांचा पालक म्हणून बोलणे म्हणजे आनंद हे सुत्र पालकांनी लक्षात ठेवायला हवे.

आपण कितीही श्रीमंत असलो तरी ती हवा मुलांच्या डोक्यात जाणार नाही याचीही पालकांनी काळजी घ्यायला हवी कारण याचाही परिणाम मुलांच्या स्वभावावर होतो. आपण कमवलेली संपत्ती सांभाळण्याची क्षमता आपल्या मुलामध्ये असावी. संपत्ती कमविण्यापेक्षा संपत्ती सांभाळायला जास्त संयम लागतो हे पालकांनी लक्षात घ्यायला हव.

> "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा."
>
> – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# ग्रामिण भागातील पालक आणि विद्यार्थी

१५० वर्षापूर्वी क्रांतीसूर्य महात्मा फुलेंनी शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले परंतु आजही ग्रामिण मधील पालकांमध्ये शिक्षणाच्या बाबतीत उदासिनता जास्त प्रमाणात दिसून येते, काही जागरूक पालक आहेत परंतु त्यांचे प्रमाण नगण्य आहे. पालकांनी मुलांच्या भविष्याचा विचार करून मुलांना योग्य ते शिक्षण दिले पाहिजे. ग्रामीणमधील पालकांकडून मुलांच्या शिक्षणाकडे पाहीजे तेवढे लक्ष दिले जात नाही. ग्रामीणमधील काही पालकांना आपलं मुल कितवीत शिकत आहे हे सुद्धा सांगता येत नाही.

मुलांना जन्म दिला म्हणजे पालकाची जबाबदारी संपत नाही तर मुलांचं संगोपन करून त्यांना सर्वगुण संपन्न तसेच त्याला स्वावलंबी बनविणे ही सुद्धा पालकाची जबाबदारी आहे.

ग्रामीण भागांमध्ये बऱ्याच ठिकाणी असं पहायला मिळत की पालक चावडीत तासंन तास गप्पा मारत बसतात परंतु पाच मिनिट शाळेत जाऊन आपल्या मुलांच्या अभ्यासाविषयी शिक्षकासोबत चर्चा करीत नाहीत ही आजची शोकांतिका आहे.

# व्यक्ती तितक्या प्रकृती हे पालकांनी समजून घ्यायला हवे

पालकांनो व्यक्ती तितक्या प्रकृती आहेत. आपल्या मुला/मुलीची प्रकृती कोणती आहे ? त्याची आवड, कुवत, शारीरिक आणि मानसिक क्षमता या सर्वांचा विचार पालकांनी करायला हवा. मुलांची प्रकृती समजावून घेऊन त्यांच्याशी संवाद म्हणजे आनंद आणि मुलाची प्रकृती समजावून न घेता सवांद म्हणजे तणाव हे सुत्र पालकांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. स्पर्धावृत्ती आणि समाजातील स्वतःची प्रतिमा यानुसार पालक विद्यार्थ्यांशी वागतात. पर्यायाने मुलं आणि पालक यांच्यामधे तणाव निर्माण होतो.

पालकांनी मुलांच्या स्तरावर जाऊन त्यांना समजावून सांगणे गरजेचे आहे. त्यामुळे मुले आपलं ऐकतात. जर पालक स्वतःच्याच स्तरावरून मुलांना समजवत असतील तर मुले ऐकत नाहीत.

पालकांनी आपले मत मुलांवर न लादता मुलांचे मत विचारात घेऊन त्यांना मार्गदर्शन करा, मग बघा मुले तुमच्या शब्दाच्या बाहेर जाणार नाहीत.

> ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे,
> जो पेईल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही.''
> – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# पालकांचा मुलांशी संवाद नसेल तर

सध्या मुलांच्या समस्या ऐकूण घेणारे कोणीच नाही. पालक म्हणतात आम्हाला काम आहे, तर शिक्षक म्हणतात आम्हाला आमचा अभ्यासक्रम पुर्ण करायचा आहे. पर्यायाने आज मुलांची फार मोठी मानसिक कोंडी झाली आहे. त्यामुळे साहजिकच पालकांविषयी मुलांच्या मनात आदर आणि विश्वास कमी होत चालला आहे. याचा परिणाम म्हणजे मुल पालकाच ऐकत नाहीत, आणि मग त्यामुळे पालकांचा ताण वाढतो.

पालक ऐकून घेत नसतील तर मुले पर्यायाने आपली व्यथा मित्राजवळ मांडतील परंतु मित्र सकारात्मतच मार्गदर्शन करेल हे सांगता येत नाही. अशा वेळी चुकीच मार्गदर्शन मिळाले तर मुले दिशाहीन होऊ शकतात.

मुलांचा मानसिक व बौद्धिक विकास करायचा असेल तर पालकांनी मुलांशी प्रतिदिन कमीतकमी १५ मिनिटे अनौपचारीक बोलणे आवश्यक आहे. यामुळे मुलं पालकाजवळ मित्राप्रमाणे आपल मन मोकळ करतील व सकारात्मक विचार करून त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.

# पालकांची मुलांप्रती निरपेक्ष भावना असावी

पालक मुलांकडून अपेक्षा ठेवून वागत असतील तर मुलांना हे आवडत नाही. माझा मुलगा समाजातील माझी पत सांभाळील का ? माझ्या संपत्तीचा व्यवस्थित सांभाळ करील का ? असे अनेक प्रश्न डोक्यात ठेवून पालक मुलांशी संवाद साधतात त्यामुळे मुलांच्या लक्षात येते की पालक आपल्याशी व्यवहारीक वागत आहेत.

मुलांनी भविष्यात आपल्या अपेक्षेनुसार वागावे अस वाटत असेल तर पालकांनी स्वतः त्याप्रमाणे सुसंस्कृत वागण्यास सुरुवात करावी मुल आपोआप त्याप्रमाणे वागण्यास सुरुवात करतील.

मुलांसोबत कधीही उपकाराची भाषा करू नये कारण मुलांना जन्म दिला म्हणजे त्याचे संगोपन व शिक्षण पुर्ण करून घेणे ही पालकांची जबाबदारी आहे.

आजकाल बऱ्याच पालकांना माझी मुलं मला म्हातारपणी सांभाळतील का ? हा प्रश्न सतावतो. परंतु यावर माझ वैयक्तीक मत आहे की जर पालकांनी मुलांवर चांगले संस्कार केले असतील तर म्हातारपणाची काळजी करायची आवश्यकता नाही.

> "जसा माणूस उपासमारिने अशक्त होऊन अल्पायुषी होतो.
> तसा तो शिक्षण अभावी जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो."
> – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# आधुनिक तंत्रज्ञान व आजची मुले

आजची पिढी संगणक, टॅब, स्मार्ट फोन इत्यादी आधुनिक उपकरणांच्या आहारी इतकी गेलेली आहे की, त्यांना वाचन, लेखन, गायन, मैदानी खेळ आणि त्या माध्यमातून विकसित होणारी बुद्धी, घडणारे मन अन शरीर यांचे महत्वच राहिलेले नाही. सुसंस्कारीत आणि राष्ट्रप्रेमी बालक घडवणे, तसेच त्यांच्यावर संस्कार करणे, हेही त्यामुळे कठीण झाले आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी पालकांनी यावर विचार करायला हवा.

आधुनिक तंत्रज्ञान तर आवश्यक आहेच परंतु त्याचा योग्य वापर न होता ते एक प्रकारचे व्यसन बनत चालले आहे. यासाठी आधुनिक उपकरणांच्या वापराचे भविष्यात होणारे दुष्परिणाम पालक आणि शिक्षक यांनी मुलांना समजावून सांगायला हवेत. मुलांना सांगण्याअगोदर पालकांनी तसे वागायला पाहिजे कारण बऱ्याच वेळा पालक मुलांना मोबाईलचा वापर कमी कर म्हणून सांगतात व स्वतःच तासनंतास मोबाईल बघत बसतात.

आवांतर वाचन तसेच प्रतिदिन सकाळी येणारे वर्तमानपत्र किती मुले वाचतात, याचा अभ्यास केल्यास आपणास लक्षात येईल की हि संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे. मुले वर्तमानपत्र किंवा इतर अवांतर वाचन न करता टिव्हीवरील हिंसक कार्यक्रम पाहतात. प्रेमभावना आणि संस्कार असलेले कार्यक्रम सध्याच्या पिढीला आवडतच नाहीत.

टिव्ही पाहणाऱ्यांच्या अपेक्षा बघुन चॅनलवाल्यांनी सुद्धा सुसंस्कारीत कार्यक्रम हा प्रकार गुंडाळून ठेवल्यासारखा झाला आहे.

अगदी लहानापासून मोठ्यापर्यंत दिवसभर कानात इअर फोन घालून आधुनिक गाणी ऐकतात. याचा आपल्या कानावर तसेच मेंदूवर किती विपरीत परिणाम होतो याचे आजच्या पिढीला भान नाही.

जग सुधारेल अथवा नाही सुधारेल परंतु प्रत्येक पालकांनी आपल्या कुटूबांचा विचार करून आत्मचिंतन करण्याची आज गरज आहे.

> **"लक्षात ठेवा तलवारीच्या धारेपेक्षा लेखणीची धार कायम टिकणार आहे आणि सर्वांत खतरनाक शस्त्र आहे म्हणून तलवार हातात न घेता लेखणी हातात घेऊन अन्यायावर मात करा."**
>
> **– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

# पालकांच्या अवास्तव अपेक्षा

आधुनिक तंत्रज्ञानामुळे मैदानी खेळाची जागा संगणकीय खेळांनी घेतलेली दिसते. सर्वच मैदानी खेळ मागे पडू लागल्यासारखे वाटतात. आजच्या मुलांचे वेळापत्रक इतके व्यस्त आहे की, त्यांची स्थिती केवळ स्पर्धेतील घोड्यासारखी झाली आहे. शाळा, अभ्यास आणि शिकवणी यातंच अधिक वेळ जात असल्याने मिळणाऱ्या रिकाम्या वेळेत संगणक व मोबाईलमध्येच मुले गुंतून राहतात. याच कारण म्हणजे आजच्या प्रत्येक पालकाची मानसिकता अशी झाली आहे की शेजाऱ्याचा लेकरू एमबीबीएसला गेल म्हणजे माझंही गेलच पाहिजे; परंतु त्यामध्ये लेकराचा बुध्यांक किती आहे, त्याला हे झेपेल का हे पाहिले जात नाही.

त्यासाठी त्याला ऑनलाईन क्लास तसेच पहाटे पाच वाजल्यापासून संध्याकाळी नऊ वाजेपर्यंत टिवीशन क्लासेस याप्रमाणे पुर्ण वेळ त्याला अभ्यासात गुंतवले जाते. त्याला मैदानी खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहन दिले जात नाही. हे सर्व जर त्या मुलांना नाही झेपलं तर काही मुले निराशा होऊन नकारात्मक विचार करायला लागतात. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या बौद्धिक क्षमतेनुसार शिक्षण द्यावे व त्याचबरोबर मैदानी खेळ खेळण्यासाठीही प्रोत्साहन द्यावे.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या योग्य वापरासाठी मुलांना मार्गदर्शन हवे

आधुनिक तंत्रज्ञानाचे तोटे जेवढे त्यापेक्षा फायदे जास्त आहेत फक्त त्याचा चांगला उपयोग कसा करावा याचे मुलांना मार्गदर्शन करणे ही आज काळाची गरज आहे. या बदलत्या काळातील मुले प्रगल्भ, बुद्धीमान आणि चाणाक्ष आहेत याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही, त्यांना योग्य दिशा देणे गरजेचे आहे. लहान मुले मातीच्या गोळ्यासारखी असतात. त्यांना आपण जस घडवू तशी ती घडतात.

केवळ शाळा आणि महाविद्यालयांतील शिक्षकांवर अवलंबून न राहता पालकांनी सुद्धा आपल्या मुलांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यासासाठी कशा पद्धतीने वापर करता येईल यावर मुलांना पालकांनी मार्गदर्शन केले तर त्याचा फायदा मुलांना नक्की होईल. शिक्षक तर मुलांना संस्कार व शिक्षण देतातच परंतु दिलेलं संस्कार व शिक्षण टिकवून ठेवणे व त्यामध्ये वाढ करणे ही पालकांचीच जबाबदारी आहे; कारण मुले शिक्षकापेक्षा पालकांजवळ जास्त वेळ असतात.

# तंत्रज्ञानाच्या गैरवापर टाळण्यासाठी...

आधुनिक तंत्रज्ञानाचा मुलांकडून होणारा गैरवापर टाळण्यासाठी पालकांनी स्वत:मध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. याची काही उदाहरणे खालील प्रमाणे. व्हाट्सअप वर मित्रांकडून ग्रुपवर येणारे न वाचण्यासारखे संदेश मुलांच्या वाचनात येणार नाहीत याची काळजी घेणे.

- असे काही व्हाट्सअप ग्रुप आहेत की त्यामधील मेसेज वाचून मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होईल. अशा ग्रुपमध्ये पालकांनी सहभागी होऊ नये.
- मोबाईल तसेच कॉम्प्यूटरचा वापर आवश्यक आहे तेवढाच करावा.
- मोबाईल तसेच कॉम्प्यूटरचा वापर फक्त अभ्यासाठीच कसा करता येईल यावर मुलांसोबत चर्चा करावी.
- टिव्हीसारख्या उपकरणांचा वापर कमीत कमी करावा.
- टिव्हीवरील कार्यक्रम पहाताना असेच पहावेत की त्यामधून काहीतरी प्रेरणा मिळेल.

वरील दिलेल्या माहितीनुसार जर पालकांनी नियोजन केले तर नक्कीच मुलांमध्ये सकारात्मक फरक पडेल.

## पालक म्हणून तुमची भुमिका

आपल्यावर प्रेम केल जातय, आपण एका कुटूबांचा भाग आहोत, आपणही काहीतरी अर्थपूर्ण करू शकतो आणि आपल्या जिज्ञासेला मोठ्याकडून प्रोत्साहन दिलं जातं असं तुमच्या मुलाला वाटण्याजोग वातावरण तयार करण्यात जर तुम्हाला यश आले, तर मुलांच्या मेंदुचा योग्य विकास आपोआप होईल. पालक म्हणून आपली भूमिका सुदृढ, समंजस व संवेदनशील मनाचा विकास घडविण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही होय.

आपले मुल मोठे होऊन सत्वशील व इतरांबद्दल सहानुभूती असलेली व्यक्ती म्हणून पाहणे हे पालक म्हणून तुमच्याकरिता किती समाधानकारक असेल याची जरा कल्पना करा. परंतु हे स्वप्न साकार करायचे असेल तर तुम्ही आपल्या मुलांपुढे कशा प्रकारे आदर्श ठेवता, मुलांना किती वेळ देता, एक पालक, शिक्षक या नात्याने आपली भूमिका तुम्ही कशा प्रकारे निभावता यावरही मुलांचा मानसिक विकास अवलंबून आहे. मुले जसजशी मोठी होतात तसतशी आईवडीलांनी हळुहळु त्यांच्या मनावर नैतिक मुल्ये बिंबवली पाहिजेत. (नैतिक मुल्य - व्यक्तीच्या वर्तनाचे नियमन करणारे वर्तणूक मार्गदर्शक तत्त्वे.)

# मुलांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याची जबाबदारी कोणाची ?

मुलांच्या व्यक्तीमत्वावर सर्वात जास्त प्रभाव त्यांच्या सवंगड्याचा असतो. त्यामुळे पालकांनी आपला मुलगा/मुलगी यांचे मित्रमैत्रिणी कोण आहेत हे नेहमी तपासले पाहिजे किंवा आपला मुलगा/मुलगी चुकीच्या व्यक्तीसोबत मैत्रिच करणार नाही अस मुलांना घडवणे म्हणजे त्यासाठी पालकांनी अगोदर आपल्या मुलां/मुलींची मित्रमैत्रिण होणे गरजेचे आहे. तर आणि तरच मुल पालकाचे ऐकतील; नाहीतर तुम्ही जर याच्यासोबत मैत्री करू नको, त्याच्यासोबत मैत्री करू नको असा दम दिला तर मुल कदापीही पालकाचे ऐकणार नाहीत हे नक्की.

त्याचप्रमाणे मुलांच्या व्यक्तिमत्वासाठी शिशू अवस्थेपासून संवेदनशील पद्धतीने मुलांची जोपासना करण्यात पालकांची सर्वात महत्वाची भुमिका आहे. कुटूबांत मुलांशी सहानुभुतीने व समजुतदारपणे वागणे महत्वाचे आहे. तसेच आपल्या भावनांवर यशस्वीरित्या, विचारशीलपणे कसे नियत्रंण ठेवायचे हे मुलांना शिकवणे आवश्यक आहे. ज्या मुलांना वरील प्रमाणे आईवडीलांकडून प्रशिक्षण मिळते ती मुले सहसा इतरांसोबत सहकार्याने व सहानुभतीने वागतात.

## आईवडीलांनी आपल्या लेकरावर भरभरून प्रेम करावे

लहानशा रोपाला उत्तमरित्या वाढ होण्याकरता व मूळ धरण्याकरता पाणी आणि सूर्यप्रकाशाची अत्यंत गरज असते, त्याचप्रमाणे आईवडीलांनी आपल्या मुलांबद्दल असलेले प्रेम शब्दांतून व कृतीतून भरभरून व्यक्त केल्यास मुलांची मानसिकता व भावनात्मक दृष्ट्या उत्तम वाढ होते. तुम्ही मुलांना जे प्रेम देता, रात्री झोपताना त्यांना ज्या गोष्टी सांगता, त्यांच्यासोबत लहान मूल बनून जे निरनिराळे खेळ खेळता यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो. लहान मुल रांगायला लागल किंवा काहीही नविन कृती केली तर त्याच्यासाठी तो एक नवा अनुभव असतो त्याला पालक म्हणून तुम्ही कितपत प्रोत्साहन देता आणि त्याच्या नव्या अनुभवात कितपत रस घेता हे मुलांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

पालकांचे प्रेम व त्यांनी केलेली देखभाल यांमुळे मुलांच्या संपूर्ण आयुष्याची पायाभरणी होते व पुढे जबाबदार व संमजस प्रौढ म्हणून त्यांचा विकास होऊ शकतो.

"ध्येय नसलेली लोक साबणाच्या फेसासारखी असतात.
काही क्षणांसाठी दिसतात आणि क्षणानंतर नाहिशी होतात."
– क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले

# मुलांचे मित्र व्हा आणि त्यांना आपले विचार कळू द्या

आपल्या मुलांच्या सहवासात तुम्ही वेळ घालवता तेंव्हा त्यांच्याशी तुमचा एक विशेष बंध तयार होतो. शिवाय, यामुळे मुले आपले विचार व भावना चांगल्याप्रकारे व्यक्त करण्यास शिकतात. मुलांना महागडी खेळणी देण्यापेक्षा आईवडील आपल्या मुलासोबत जो वेळ घालवतात तो जास्त महत्वाचा आहे. आपल्या घरातील दररोजचे वेगवेगळे लहानमोठे निर्णय घेताना सुद्धा मुलांना त्यामध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे, त्यामुळे मुलांची निर्णय क्षमता वाढण्यास मदत होते.

मुलांचे आनंदाने बागडण्याचे एक वय असते त्या वयात त्यांना मोकळेपणाणे खेळू द्या कारण यामुळे मुलांचा बौद्धीक, भावनात्मक आणि सामाजिक विकास छान होतो.

मुलांना आपल्या स्वत:भोवतीच्या विश्वाचे मनसोक्त निरीक्षण करू द्या, लहानसहान अडथळ्यांना तोंड देऊन आपल्या बुद्धीच्या परीने त्यांवर मात करू द्या म्हणजे त्यांची निर्णय क्षमता वाढेल.

# पालकांनी मुलांच्या मनावर लहानपणापासूनच महामानवांचे विचार रुजवावेत

आपल्या मुलांना अगदी लहानपणापासूनच दररोज रात्री झोपताना राजमाता जिजाऊंपासून ते माता रमाई पर्यंत तसेच छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंतच्या सर्व कर्तुत्ववान व्यक्तींच्या जीवनातील छोट्या मोठया प्रसंगावरील काही गोष्टी मुलांना सांगितल्या तर पुढे असे लक्षात येईल की, आपण सांगितलेल्या गोष्टीपैकी बऱ्याच गोष्टी मुलांच्या तोंडपाठ झालेल्या असतील.

त्यामुळे मुलांच्या मनावर लहानपणापासूनच महामानवांचे विचार रुजवले जातील व या गोष्टींचा सकारत्मक परिणाम मुलांच्या जीवनावर झाल्याशिवाय राहणार नाही. भविष्यात मुलांना काहीही अडचणीचे प्रसंग आले तर मुले त्या अडचणीला छत्रपती संभाजी राजेसारखे सहज तोंड देतील.

> ''देवासाठी पैसा खर्च करू नका. तोच पैसा शिक्षणाला द्या.
> मंदिराची भर करू नका, जो विद्यार्थी हुशार आहे, तो पैसा त्याला द्या.
> धर्मकृत्य करण्यासाठी नाही, विद्या घेण्यासाठी पैसा खर्च करा.''
>
> – संत गाडगेबाबा

# विद्यार्थ्यांचा शिक्षकांप्रति भाव कसा असावा

शिक्षक मुलांना त्यांच्याकडे असलेले विद्यारूपी अमुल्य धन देतात, शिक्षकांच्या या उपकाराची परतफेड करणे अशक्य आहे. शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिक्षकदिन साजरा केला जातो. तसेच विद्यार्थ्यांने संधी मिळेल त्यावेळेस शिक्षकांप्रती आदर केला पाहिजे. शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनातील अज्ञान दूर करून व्यवहारातील अनेक विषयांचे ज्ञान देतात. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनातील दिशादर्शक आहेत. जीवनातील अयोग्य गोष्टी टाळाव्यात, आदर्श वागावे यासाठी शिक्षक कधी कधी शिक्षा करतात; परंतु आज काल शिक्षा केल्यानंतर मुलांसह आईवडीलांना सुद्धा राग येतो. जसे कुंभार मडके घडवण्यासाठी कच्च्या मडक्याला थापटी मारतो, त्याचप्रमाणे शिक्षक सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये प्रगती होण्यासाठी थोडीफार शिक्षा करतात.

मुलांच्या जीवनाला योग्य आकार मिळावा तसेच मुलांचे जीवन समाजासाठी आदर्शवत आणि आनंददाई व्हावे असे शिक्षकाला सतत वाटत असते. त्यामुळे मुलांच्या जीवनातील शिक्षकांची भुमिका फार महत्वाची आहे, त्यांचा आदरच व्हायला हवा.

# पुर्वीचा पालक-शिक्षक-विद्यार्थी

जिथे शिक्षकांचा सन्मान होत नाही तिथे समाजासह देशाची प्रगती खुंटते. विद्यार्थ्यांना घडवण्यात शिक्षकांची मोठी भूमिका असते. काळानुसार ही भूमिका बदलत आहे. पालक-शिक्षक यांच्या बदलत्या भुमिकेमुळे शिक्षक-विद्यार्थी यांच्या नात्यावर परिणाम होत आहे. तीस वर्षांपूर्वी गुरुजी विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी मार द्यायचे, मारले तरी त्यावेळी पालक शिक्षकांना काही बोलत नव्हते, उलट विद्यार्थीच आईवडिलांना सांगत नव्हते कारण तुला शिक्षा झाली म्हणजे तूझ चुकल असेल अशी वडीलांची धारणा पक्की होती.

याचा परिणाम असा होत होता की शिक्षकांबद्दल भीतीयुक्त आदर होता. शिक्षक हेच सुधारण्याचे प्रवेशद्वार यावर पालकांचा पक्का विश्वास होता. शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांची मानसिकता अशी झाली होती की आयुष्यात येणाऱ्या समस्या स्वतःला सोडवायच्या असतात. आपल्याला शिक्षकांनी मारले तरी आपले आई-वडील शाळेत येऊन शिक्षकांना काहीच बोलले नाहीत. शिक्षकांच्या धाकामुळे नियमबाह्य किंवा गैरवर्तन विद्यार्थी करत नव्हते. याचा परिणाम पुढील आयुष्यात नोकरी-व्यवसाय करताना सुध्दा खूप उपयोगी पडत होता.

# आजचा पालक-शिक्षक-विद्यार्थी

आजकालचे पालक विद्यार्थ्यांच्या छोट्या छोट्या गोष्टींमध्ये ढवळाढवळ करून शिक्षकांशी वाद करायला शाळेत जातात आणि हा वाद मुलांसमोर करतात. त्यामुळे मुलांच्या लक्षात येते की, आई-वडील हे आपल्या प्रत्येक समस्या सोडवतात, खर तर या समस्या नसून बऱ्याच वेळा विद्यार्थ्यांचे गैरवर्तन असते परंतु ते त्याला कधीच मान्य नसते. आई-वडील आपल्या वर्तणुकीला सपोर्ट करतात बघून मुलांचे सुधारण्याचे मार्ग हळूहळू कमी होत जातात. त्यामुळे मुलं आळशी बनतात व पुढे स्वतःहुन छोट्या मोठ्या संकटाला तोंड देऊ शकत नाहीत. हे सर्व त्या मुलांना समजत नसते किंबहुना हे समजण्याचे त्याचे वयच नसते, परंतु हे पालकांना समजत असते मात्र आंधळ्या प्रेमापोटी पालक समजण्याच्या मनस्थितीत नसतात. परंतु आजची परिस्थिती पाहता पालकांनी वेळीच लक्षात घ्याव की हे आंधळ प्रेम आपल्या मुलाचं भावी आयुष्यासाठी घातक आहे.

काही पालक याला अपवाद आहेत परंतु ती संख्या फार कमी आहे.

# शिक्षण कायद्याचा गैरवापर

शिक्षण कायद्याच्या गैरवापरामुळे विद्यार्थ्यांना मारणे सोडाच साधे रागावणे कठीण होऊन बसले आहे. शिस्त लावण्यासाठी शिक्षा द्यावी तर काय द्यावी हा प्रश्न शिक्षकाला पडतो. शिक्षा द्यायची म्हणून जर वर्गाच्या बाहेर काढले किंवा वर्गात उभे केले तर पालक ओरडतात की त्याच्या मानसिकतेवर परिणाम झाला, आता तो शाळेत यायला नाही म्हणतो. समजा एखाद्या शिक्षकांने त्याच्याशी बोलणे सोडले तर पालक लगेच म्हणतात पाहू शिक्षक किती दिवस बोलत नाही तुझ्याशी. तू स्वतःहून बोलू नकोस. प्रिन्सिपल ला सांगून शिक्षकाला तुझ्याशी बोलायला मी भागच पाडते.

आपल्या मुलाला जर सुसंस्कारित वळण लावायच असेल तर यात पालकांची भूमिका महत्वाची आहे. कारण पालक जर मुलांचे नको ते लाड करत बसले तर मुलांमध्ये सुधारणा होणे कदापीही शक्य नाही. कारण काही मुलांना फक्त तोंडी सांगून समजते, काहीनां रागवावे लागते तर काहींना थोडी फार शिक्षा द्यावीच लागते त्याशिवाय विद्यार्थाची प्रगती नाही.

कालच एक बातमी वाचली नाशिकमध्ये एक पाचवीचा विद्यार्थी दोन दिवस शाळेत आला नाही म्हणून शिक्षकाने आईला फोन करून सांगितले. आईने सांगितले की तो रोज शाळेत जातोय. ज्यावेळेस आईने मुलाला विचारले, तेव्हा तो कबूल झाला मी शाळेत जातो सांगून घरातून निघतो पण शाळेत जातचं नाही. तो वाईट मुलांच्या संगतीला लागला होता. म्हणून आईने त्याला दोन फटके दिले. आईने मारले याचा राग आला म्हणून त्याने विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. आता या घटनेला कोण जबाबदार?

# मुलांच्या संस्काराबाबत आईची भूमिका महत्वाची

जिथे शिक्षकांचा सन्मान होत नाही तिथे समाजाची प्रगती खुंटते आणि देशाची प्रगती थांबते .

पालकांना विनंती आहे की शिस्त ही प्रेमाची पहिली पायरी आहे. शिक्षकांना त्यांची कामे करू द्या. शाळेचे छोटे छोटे नियम पाळावेच लागतात कारण त्यातून मोठेपणी भारतातील कायदे पाळण्याचे संस्कार रुजत असतात. शाळेत थोड्या उशिरा पोहोचल्याने मुलांमध्ये वेळेचे व्यवस्थापनाचे महत्त्व कमी होते याचे ज्ञान पालकांना असले पाहिजे. आजकालची मुलं अति लाडा पोटी बिघडत चालली आहे त्यांना कोणाचीच भीती उरली नाही.

त्यांची वाढ अशीच झाली तर पुढे ते आई–वडिलांची झोप उडवू शकतात म्हणून शाळा, शिक्षक आणि पालक यांच्यात मैत्रीपूर्ण वातावरण असणे गरजेचे आहे. शाळेत होणाऱ्या पालकांच्या मिटींगला शिक्षकांशी सन्मानानी बोलणे, त्यांना समजून घेणे हे तेवढेच महत्त्वाचे आहे. पालक–शिक्षकांमध्ये एकमेकां बद्दल जर आदर आणि सन्मान राहिला तर विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवणे सोपे जाईल.

# आदर्श शिक्षक कसा असावा

भारतीय संस्कृतीत गुरूला जी प्रतिष्ठा मान सन्मान होता तो कुठतरी सद्या हरवत चाललेला दिसत आहे. चारित्र्य संपन्न, शिलवान, विद्यार्थी प्रिय शिक्षक आजही बघायला मिळतात. मात्र पुर्वी इतका सन्मान गुरुंना आज मिळत नाही, हे वास्तव आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन शिक्षकांनी स्वतःच आत्मपरिक्षण करावं. बऱ्याच वेळा असं होत की शिक्षकांमध्ये हजारातील एकाकडून एखादी चुक घडली की, सर्व शिक्षकांकडे त्याच नजरेने पाहिल जातं परंतु हे चुकीच आहे.

आज तुम्ही आदर्श शिक्षक असाल किंवा नसाल पण तुम्हाला आदर्श मानणारे ४०–५० चिमुकले जीव तुमच्या वर्गात आहेत, हे लक्षात ठेवा. अपरिपक्व बालबुध्दीची मुले तुमच्याकडे आदर्श म्हणूनच पाहतात. या चिमुकल्या जीवांची नजर सतत तुमच्यावर खिळलेली आहे. ही जाणीव तुम्हाला योग्य मार्गावर ठेवील व तीच तुम्हाला आदर्श शिक्षक बनवतील.

शिक्षक म्हणजे...
शि–शिलवान
क्ष–क्षमाशील
क–कर्तृत्वान

ज्यामधे हे सर्व गुण असतात तो खरा आदर्श शिक्षक...

# शिक्षण या प्रक्रियेत शिक्षक हा महत्वाचा घटक

शिक्षण ही एक प्रक्रिया असून या प्रक्रियेत विद्यार्थी, शिक्षक व संस्थाचालक हे प्रमुख घटक असून या तीन घटकांत शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची असते. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मित्र, मार्गदर्शक व सल्लागार असतो. विद्यार्थी शिक्षकांचे अनुकरण करतात व शिक्षकही विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे काम करत असतात. त्यामुळे शिक्षक हा चारित्र्यसंपन्न व आदर्श असला पाहिजे. शिक्षक जसा विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक असतो तसाच तो समाजाला मार्गदर्शन करणारा अभियंता देखील असतो. म्हणून सध्या या दिशाहीन झालेल्या परस्थितीत विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी एकत्र येऊन विचार करण्याची वेळ आली आहे. समाजाला योग्य दिशा देण्यासाठी शिक्षकांची कार्यतत्परता खूप महत्वाची आहे. शिक्षकांच्या छोट्या मोठ्या कृतीकडे विद्यार्थी तसेच समाजाचे लक्ष असते. त्यामुळे शिक्षकांचे व्यक्तीमत्व जेवढे प्रभावी, परिणामकारक, ज्ञान समृद्ध असेल तेवढे ते विद्यार्थी व समाजासाठी उपयुक्त असते.

# तथागत गौतम बुद्ध, संत नामदेव, संत तुकाराम महाराज हे बहुजन समाजाचे आदर्श गुरूच(शिक्षक) होते

भारतीय समाजात तशी शिक्षकाची खूप प्राचीन परंपरा आहे. परंतु प्राचीन काली गुरु पद फक्त विशिष्ट जातीपुरते मर्यादित होते. यातून संघर्ष निर्माण होऊन बहुजन समाजामध्ये खऱ्या अर्थाने गुरुपद हे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्यापासून सुरु झाले. ज्या वेळेला जगात सर्वदूर अंधकार होता त्यावेळेस तथागत गौतम बुद्धरुपी गुरुकडून भारतीय समाजाला एका सुंदर धर्माचे ज्ञान मिळत होते. त्यानंतरची भारतीय समाजात खूप मोठी संत परंपरा आहे. संत कबीर, संत रविदास, संत नामदेव, संत तुकाराम अशा विविध संतांनी भजन-कीर्तन कार्यक्रमांच्या माध्यमातून भारतीय समाजाला शिक्षित करण्याचे काम केले.

त्या वेळी शिक्षण जरी कागदावर नसले तरी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांनी समाजाला विचार करायला प्रवृत्त केले व त्याच क्रांतिकारी विचारांना अनुसरत छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणाचे राज्य उभे केले. यातून आपणांस दिसून येते की छत्रपती शिवाजी महाराजांनी संत तुकाराम महाराजांना आपले गुरू( शिक्षक) मानले.

# कळयांचे फुलात रूपांतर करतो तोच शिक्षक

विनोबांनी शिक्षणावर भाष्य करताना फार मार्मिक सुत्र सांगितले आहे, ते म्हणतात शिक्षक विद्यार्थीनिष्ठ असावा, विद्यार्थी ज्ञाननिष्ठ असावा, ज्ञान समाजनिष्ठ असावे आणि समाज समतानिष्ठ असावा. शिक्षक जर विद्यार्थीनिष्ठ असेल तर कळ्यांचे फुलात रूपांतर करू शकतो. पाठ्यपुस्तकाबरोबर उघड्या जगाचे पुस्तकही शिकवतो.

चांगला विद्यार्थीनिष्ठ शिक्षक हा सहवासातून, संवादातून, चारित्र्यातून, मनाची श्रीमंती असलेला कर्तबगार विद्यार्थी घडवू शकतो आणि पुढे तो कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून जगू शकतो. आपण हे लक्षात घेतल पाहिजे की दुसऱ्या कोणत्याही उपायांनी आदर्श नागरीक निर्माण करता येत नाही. ज्या समाजामध्ये मतदारापेक्षा आदर्श नागरीकांची संख्या अधिक असते तो समाज, तो देश अजिंक्य ठरतो. असे सजग आणि सेवाभावी नागरीक केवळ उत्कृष्ठ असणारा शिक्षकच निर्माण करू शकतो हे विसरता कामा नये.

# आकाशाशी दोस्ती करायला शिकवतो तो खरा शिक्षक

मुलांमध्ये सदैव रमणारे साने गुरूजी म्हणतात, जो मुलांना पावसात भिजायला शिकवतो, आकाशाशी दोस्ती करायला शिकवतो तो खरा शिक्षक. नाहीतर विद्यार्थ्यांना गणिताची सुत्रे येतात पण त्यामागची तर्कसंगती समजत नाही. मग आयुष्यात तो विसंगतीचाच पाठपुरावा करतो. विद्यार्थ्यांना कविता शिकविल्या जातात परंतु त्यातील सौंदर्य त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. विज्ञानाचे प्रयोग करतात पण त्यामागील विज्ञाननिष्ठा रुजत नाही. विद्यार्थ्यांचा कल, त्यांची आवड व त्यांच्यातील क्षमता ओळखून त्याला आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिक्षक योग्य मार्गदर्शन करू शकतात.

म्हणून शिक्षक हा नेहमी संवेदनशील हवा. शिक्षकांनी आपल्या समाजातील प्रतिमेला तडा जाणार नाही तसेच आपल्या सुखदुखाचा किंवा मानापमानाचा लवलेशही विद्येच्या प्रांगणात प्रतिबिंबित होणार नाही याची काळजी घेतली तरच ज्ञानदानाचे पवित्र कार्य तेवढयाच तन्मयतेने, उत्कटतेने पूर्ण होईल. शिक्षक आनंदी असेल तरच विद्यार्थ्यांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यास मदत होईल.

> "जर तुमच्याकडे दोन रूपये असतील तर एक रूपयाची रोटी घ्या आणि एक रूपयाचे पुस्तक घ्या. रोटी तुम्हाला जगण्यास मदत करेल तर पुस्तक तुम्हाला जगावे कसे ते शिकवेल."
>
> – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# शिक्षक कसा असावा

अध्यापन हा व्यवसाय नसून सर्मपित भावनेने करावयाची उपासना आहे. ते केवळ उपजीविकेचे साधन नाही. अध्यापन हे केवळ अक्षर ओळख करून देणारी आणि चार गणिते, दोन कविता शिकविणारी शाळा नव्हे तर कर्तबगार नवी पिढी घडविणारी प्रयोगशाळा आहे. अशी भुमिका घेऊन काम करणारा शिक्षक आज हरवल्याचे दिसत आहे.

विद्यार्थी जसा निव्वळ परीक्षार्थी असता कामा नये तसा शिक्षकही निव्वळ अर्थार्जनाचे साधन म्हणून शिक्षण क्षेत्राकडे पाहणारे असता कामा नये. शिक्षक असण्याची पहिली अट विद्यार्थी असणे हिच आहे. झपाट्याने बदलणाऱ्या काळात सतत अद्यावत राहणे हे शिक्षकांसाठी देखील गरजेच आहे. काळाची नवीन आव्हाने पेलण्यासाठी शिक्षक-विद्यार्थी दोघांनाही अद्यावत राहणे आवश्यक आहे. चांगला शिक्षक विद्यार्थ्यांना विचारप्रवृत करतो. माहिती-व्यवस्थापन करत कुतूहल व जिज्ञासा जागृत करण्याचे काम शिक्षकांचे आहे.

आदर्श शिक्षकाचा एक महत्वाचा गुण म्हणजे शिक्षक हा वाचनप्रिय असला पाहिजे. विषयांसह इतर अवांतर वाचन शिक्षकांनी करायला पाहिजे. शिक्षकाने नेहमी चिंतनशील असावे. कोणत्याही समस्येची उकल होण्यासाठी सखोल चिंतन आवश्यक असते. आपल्या शाळेमधुन फक्त परीक्षार्थी तयार न करता सुसंस्कारीत आदर्श व्यक्ती तयार झाल्या पाहिजेत ही शिक्षकाची भूमिका असली पाहिजे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नेहमी सकारात्मक भूमिका असावी कारण आदर्श विद्यार्थी हा शिक्षकांच्या शब्दाला प्रमाण मानतो.

विज्ञान तंत्रज्ञानाचे युग असल्याने स्वतःला अद्यावत ठेवणे आवश्यक आहे, परंतु आजची परिस्थिती पाहता बऱ्याच शिक्षकांना संगणक हाताळता येत नाही. कोरोना काळात लक्षात आले की बरेच शिक्षक ऑनलाईन शिक्षण देताना चाचपडत होते. आपण सर्वांनीच काळानुसार बदल स्विकारले नाहीतर आपली अधोगती होणारच हा नैसर्गिक नियम आहे.

# ग्रामीण शिक्षण व्यवस्था-शिक्षक-पालक

ग्रामीण भागातील पालक जास्त करून अशिक्षीत असतात. दहावी-बारावी, एम.ए/एम.एस्सी पुर्ण होऊनही आपल्या पाल्याचा हाताला काही लागले नाही, हे त्यांच्या लक्षात येते तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. आपल्या पाल्याच केवळ वय वाढलं, विद्यमान समाजरचनेत तो स्वतः ची जागा निर्माण करण्यास कुचकामी ठरला आहे, अस समजल्यावर पालक जवळपासच्या लोकांशी व शेजाऱ्यांशी शिक्षणावर बोलताना, शिक्षकांना किंवा शाळा- कॉलेजला दोष न देता आपला पाल्य कुचकामी ठरला असा समज करून घेतात. अशा पालकांचा बनलेला समाज ज्या ज्या ठिकाणी जास्त आहे त्या त्या ठिकाणच्या शिक्षण व्यवस्थेला आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे.

# आपल्या शिक्षकाप्रमाणे आपण असावं...

विद्यार्थी शिक्षकाचे अनुकरण करत असतात. विद्यार्थ्यांसाठी शिक्षक हे नायक असतात. आपल्या शिक्षकांप्रमाणे आपण असाव, दिसावं व बनावं असे विद्यार्थ्यांना वाटणे साहजिकच आहे. सदाचारी, शीलवान, सत्यवान व विद्यार्थीप्रिय शिक्षकांच्या प्रभावाने चांगली पिढी आकार घेत असते. शिक्षकांचा पोशाख व त्याचे व्यक्तिमत्त्व हे विद्यार्थ्यांवर प्रभाव टाकणारे घटक आहेत. म्हणून शिक्षकाचे राहणीमान व त्याचे एकूण व्यक्तीमत्व हे साजेशे असले पाहिजे.

विद्यार्थांशी संभाषण करत असताना योग्य शब्दांचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उध्दट शब्दांचा प्रयोग करणाऱ्या शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आदर व आत्मीयता अजिबात शिल्लक राहत नाही. आपले शिक्षक जर तंबाखू खात असतील व दारू पित असतील तर तंबाखू खाणे किंवा दारू पिणे यात वाईट काही नाही, असा समज विद्यार्थ्यांचा होतो. तसेच आपले शिक्षकच आपल्याला कॉपी पुरवतात असे लक्षात आल्यावर चुकीच्या गोष्टी सुद्धा विद्यार्थ्यांना योग्य वाटायला लागतात. या सर्व गोष्टींचा परिणाम विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यावर होतो. त्यामुळे शिक्षकांने जबाबदारीने वागलं पाहिजे.

# शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांची प्रेरणाच...

एखाद्या अभ्यासात मंद असलेल्या विद्यार्थ्याला तु काहीच कामाचा नाहीस, तु दगड आहेस, तुला काही येणारही नाही अशा पद्धतीने वाक्य प्रयोग केल्यानंतर विद्यार्थी निश्चितच प्रेरित होणार नाहीत. परंतु तु करू शकतोस, तुझ्यात त्या क्षमता आहेत, तुझ्यातील हे गुण वाखाणण्यासारखे आहेत. अशा पद्धतीचे प्रोत्साहन देणारे शब्दप्रयोग हे विद्यार्थांसाठी अत्यंत महत्वपुर्ण असतात. त्यांचा मानसिक व भावनिक विकास या अशाच वाक्यांनी होत असतो.

परंतु विद्यार्थ्यांशी केलेले नकारात्मक संवाद त्याच्या आयुष्याचे वाटोळे करायला पुरेसा असतो. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सदैव प्रेरणा दिली पाहिजे. शिक्षकाचे व्यक्तीमत्व असे असावे कि विद्यार्थ्याला त्या प्रभावाने एक सज्जन नागरिक बनण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे.

> "हातावरील रेषेत दडलेले भविष्य बघू नका,
> त्याच हाताने कष्ट करा आणि स्वत:चे भविष्य घडवा."

## विद्यार्थी आपल्या शिक्षकाच्या विचारांवर मार्गक्रमण करीत असतो

शाळा स्तरावर विद्यार्थी आपल्या आई-वडीलापेक्षा शिक्षकाच्या विचारांवर मार्गक्रमण करीत असतो. त्याच्या मनात शिक्षकांबद्दल आदर असतो. असे असताना जर शिक्षक आपल्या जीवन प्रवासात कुठे चुकीचे कार्य करीत असेल तर त्याच्या श्रध्देला खूप मोठा तडा जात असतो. विद्यार्थ्यांशी व विशेष करून विद्यार्थिनींशी बोलण्याची पध्दत व एकूण भाषाशैली सुद्धा आपल्या नात्याला सुसंगत अशी असली पाहिजे. वयात आलेल्या विदयार्थ्यांना समजून घेऊन त्यांना निकोप व योग्य मार्ग शिक्षकांना दाखवता आला पाहिजे. अतिशय मनमोकळेपणाने विद्यार्थ्यांनी आपल्या समस्या शिक्षकांसमोर मांडल्या पाहिजे. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या या पवित्र नात्याला उंचीची मर्यादा अजिबात नाही. गुणी शिक्षकांमध्ये असलेले शिष्टाचार आणि विद्यार्थ्यांमध्ये असलेली आदराची भावना या नात्याला सर्वोच्च टोकावर नेऊ शकतात. चारित्र्यसंपन्न शिक्षकाला हे सहज शक्य आहे. प्रचंड ज्ञानी शिक्षकापेक्षा विद्यार्थ्यांना प्रेरित करणारा शिक्षकच आदर्श शिक्षक म्हटला पाहिजे.

## शिक्षक हा आजन्म विद्यार्थी असला पाहिजे
### .....विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.....

एकदा शिक्षक झालो म्हणजे सारे काही संपले, ही भावना बदलली पाहिजे, आपण एकविसाव्या शतकामध्ये आहोत. दर दुसऱ्या दिवशी ज्ञान बदलत आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध बदल शिक्षकांनी जाणून घेतले पाहिजेत. मी बी.ए.बी.एड., एम.ए.बी.एड., नेटसेट अर्हता प्राप्त आहे मला आता नवीन काही शिकायची गरज आहे? ही वृत्ती शिक्षकांमध्ये असता कामा नये. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १८ तास अभ्यास करायचे. शिक्षकांनी सदैव नवनवीन ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. एम.ए. पीएच.डी., डी.डी.एस.सी., डी.लिट. अशा प्रचंड पदव्या त्यांच्याजवळ होत्या. अनेक विषयाचे त्यांना प्रचंड ज्ञान असताना सुद्धा ते स्वत:ला आजन्म विद्यार्थी समजत होते. त्यांच्या तुलनेत आपण शुन्य आहोत; की आपले स्थान काय याचे आत्मपरिक्षण झाले पाहिजे..

> "कौतुक हा शब्द खूप छोटा आहे,
> पण ते करायला मन मात्र मोठे लागते."

# बदलत्या तंत्रज्ञानाशी शिक्षकांनी जुळवून घेतले पाहिजे

आपल्यापैकी बरेच शिक्षक या बदलत्या काळानुसार स्वतःला बदलायला अजुनही मानसिकदृष्ट्या तयार नाहीत. बऱ्याच शिक्षकांना आजही आपले स्वतःचे इमेल आयडी हाताळता येत नाहीत. झुम मिटींग आयोजित करणे, झुम मिटींगमध्ये सहभागी होणे, गुगल मिटचे आयोजन करणे, ट्विटरचा वापर करणे, ब्लॉग लेखन, अध्यापनासाठी प्रोजेक्टरचा वापर करणे, विविध प्रकारच्या लिंक तयार करून विद्यार्थ्यांकडून अध्ययन सराव करून घेणे अशा अनेक बाबी आहेत ज्या या एकविसाव्या शतकामध्ये शिक्षकासाठी अत्यावश्यक आहेत.

संगणक, लॅपटॉप तसेच मोबाईल इत्यादींचा वापर करून आधुनिक शैक्षणिक बाबी विद्यार्थ्यांसमोर प्रभावी पध्दतीने शिक्षकाला मांडता येणे गरजेच आहे. परंतु अजूनही बरेच शिक्षक तांत्रिक बाबींकडे सकारात्मकतेने पाहताना दिसत नाहीत. आजच्या स्पर्धेत टिकायच असेल तर आपल्याला बदल स्वीकारणे गरजेच आहे. काही शिक्षक याला अपवाद आहेत परंतु ती संख्या खूप कमी आहे.

# उपक्रमशील शिक्षक शाळेच भुषण असतात

ज्या शिक्षकांच्या अंतर मनामध्ये विद्यार्थ्यांबद्दल तळमळ असते, असे शिक्षक स्वस्थ बसू शकत नाहीत. विद्यार्थ्यांकरीता काहीतरी चांगले करण्यासाठी त्यांची सारखी धडपड असते. त्यांची हीच तगमग नवनवीन उपक्रमांना जन्म देत असते. महाराष्ट्रासह देशात कोरोना महामारीच्या काळात शाळा बंद होत्या. बंद असताना सुद्धा उपक्रमशील शिक्षक मात्र स्वस्त बसलेले नव्हते. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांकरीता ऑनलाईन अध्ययनाच्या विविध कल्पना शोधुन काढल्या.

युट्युबवर विविध व्हिडीओ अपलोड करणे, झुम तसेच गुगल मिटवर ऑनलाईन स्वाध्याय घेणे, व्हाट्सअप ग्रुपवर अध्यापन, फेसबुकवर लाईव्ह सेशन घेणे अशा अनेक उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना ज्ञान दिले. अशा उपक्रमशील शिक्षकांसह त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांच्या कामाची दखल घेऊन अभिनंदन केल पाहिजे. खरतर कोरोना काळात असे विविध उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांना महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार द्यायला हवा.

> "कष्ट हा उंबरठ्यावरचा दिवा आहे,
> तो वर्तमान आणि भविष्य दोन्हीकडे उजेड पाडतो."

# उपक्रमशील शिक्षकांचे कौतुक झाले पाहिजे

दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की अजुनही खरे उपक्रमशील आदर्श शिक्षक शासनाच्या आदर्श शिक्षक पुरस्कारापासून वंचितच आहेत. याकरिता गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. उपक्रमशील शिक्षक काही वेळेस शाळेसाठी व इतरांसाठी थट्टेचा विषय ठरत असतो. या माणसामुळे आपल्यामागे कामं लागतात, ही धारणा बाकी शिक्षकांची होत असते. काही ठिकाणी मुख्याध्यापक सकारात्मक असतात तर काही ठिकाणी मुख्याध्यापकांना सुद्धा ही उपक्रमांची कटकट नको असते.

अशा ठिकाणी उपक्रमशील शिक्षकांची भावनिक व मानसिक कुचंबना होत असते. हे असे वातावरण म्हणजे चांगले संकेत नाहीत. उपक्रमशील शिक्षकांना प्रोत्साहन मिळालं पाहीजे. त्यांना आवश्यक ती मदत झाली पाहिजे. त्यांच्या उपक्रमाचे जाहीररित्या कौतुक केले पाहिजे. असे झाले तरच शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होणार आहे व प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र आपण घडवू शकणार आहोत.

# केवळ शाळेच्या वेळेच्या चौकटीतच मी काम करणार

केवळ शाळेच्या वेळेच्या चौकटीतच मी काम करणार ही भुमिका बदलली पाहिजे. आज सुध्दा काही शिक्षक कित्येक वेळा शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर विविध उपक्रम पार पाडत असताना सकाळी नऊपासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये गुंतलेले असतात, कृतियुक्त अध्यापनास वेळ मिळावा म्हणून कित्येक वेळा दिवाळीच्या सुट्या विद्यार्थ्यांकरिता खर्ची घालतात.

अशा कामाचा एक वेगळाच आनंद त्यांना मिळत असतो. आणि या अतिरीक्त दिलेल्या वेळेच्या फायद्याची अपेक्षा कधीही ठेवत नाहीत. अशा समर्पण वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांचे काम लक्षात घेऊन ते नाऊम्मेद होणार नाहीत याची काळजी मुख्याध्यापक व व्यवस्थापनाने घेतली पाहिजे.

> "फक्त वही पेन म्हणजे शिक्षण नव्हे, तर बुद्धिला सत्याकडे, भावनेला माणुसकीकडे, शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण."
>
> – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## अत्याधुनिक अध्ययन साधनांची आवश्यकता

शिक्षकांसाठी अत्याधुनिक अध्ययन साधनांची उपलब्धता नसणे ही शाळांची खूप मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी पारंपारिक अध्ययनाशिवाय पर्याय नाही. खरेतर प्रत्येक शाळेत एलसीडी प्रोजेक्टर, संगणक लॅब, इंग्लिश लॅब, एलईडी टिव्ही, टॅब, स्मार्ट क्लासेस, एकूणच शाळेचे डिजिटलायजेशन ही आज काळाची गरज आहे. परंतु शिक्षण विभागाला याची क्रमप्राप्तता लक्षात यायला कदाचित अजून काही वर्ष लागतील. काळ खूप झपाट्याने बदलत आहे. येणाऱ्या काळात पुस्तक आऊटडेटेड होणार आहेत. अध्यायन अध्यापनात यंत्राचा शिरकाव होणार आहे. इतर प्रगत देशामध्ये शिक्षण हे तंत्रज्ञानधिष्ठीत होऊन दोन दशकापेक्षा जास्त काळ उलटला आहे.

## शिक्षकाने विद्यार्थ्याला वैचारिक स्वातंत्र्य दिले पाहिजे

विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याचे धैर्य येण्यासाठी शिक्षकाने विद्यार्थ्यांना वैचारिक स्वातंत्र्य दिले पाहिजे. विद्यार्थी प्रश्न विचारतो म्हणजे शिक्षकाने वाईट वाटून घेऊ नये. प्रश्न विचारणे हे एकविसाव्या शतकातील सर्वोत्तम कौशल्य आहे. माजी राष्ट्रपती डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणतात  की विद्यार्थ्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य कोणते असेल तर ते प्रश्न विचारणे होय. शिक्षकांना त्याबाबत पुरेशी माहिती नसेल तर आपण नंतर सांगतो म्हणून विद्यार्थ्यांना आश्वासित केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारल्यानंतर शिक्षकाने वाईट वाटून घेऊ नये उलट चांगले प्रश्न विचारल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले पाहिजे. यालाच सकारात्मक वर्तन म्हणतात माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांनी माझा आवडता शिक्षक म्हणून इतर शिक्षकांना स्थान दिले असेल तर त्याचे स्वागतच करावे द्वेष करू नये. यालाच म्हणतात सकारात्मक भावना.

## एकविसाव्या शतकाला सामोरे जाणारा शिक्षक

कालचा शोध आज जूना होत आहे. शिक्षण क्षेत्र याला अपवाद नाही. नवनवीन अध्ययन अध्यापन तंत्र समोर येत आहेत. हे जग विज्ञानवादाने झपाटलेले आहे. शिक्षकांनी खुर्चीवर बसून  तासन्तास विद्यार्थ्यांशी गप्पा मारत बसणे हे आता आउटडेटेड झाले आहे. केवळ पुस्तक वाचून अध्यापन करणे आता अभिप्रेत नाही. केवळ पाठावरचे प्रश्न उत्तर घेणे आणि लिहून देणे किंवा विद्यार्थ्यांना भरपूर गृहपाठ देणे हे मुळीच अभिप्रेत नाही. शिक्षणाचे पुर्णपणे डिजिटलायझेशन होत चालले आहे. पारंपारिक खडू आणि फळा आता मागे पडत असून डिजिटल बोर्ड आलेले आहेत. अशा परिस्थितीत शिक्षकांनासुध्दा बदलून स्मार्ट व्हावे लागणार आहे. पारंपारिक पुस्तकातून आता डिजिटल परिवारामध्ये प्रवेश करावा लागणार आहे. जो हे सर्व बदल स्विकारेल तोच एकविसाव्या शतकाला सामोरे जाणारा कौशल्यवर्धक शिक्षक असेल.

# मुलांच्या मनातील अंधश्रध्दा शिक्षक कमी करू शकतात

आंधळेपणाने एखादी गोष्ट स्वीकारणे यास अंधश्रद्धा असे म्हणतात. शिक्षण हे असे एक माध्यम आहे, ज्यामुळे बऱ्याच अंधश्रद्धा समूळ नष्ट होण्यास मदत मिळते. त्यामुळे मुलांच्या प्राथमिक शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासून अंधश्रद्धा दूर करण्याचा शिक्षकाकडून प्रयत्न झाल्यास, विद्यार्थ्यांच्या मनात अंधश्रद्धा डोकावणार नाही. प्रत्येकाच्या घरातूनच बालमनावर याविषयी नकळत अंधश्रध्दा रुजवली जाते. त्यामुळे ते त्या रिंगणाच्या बाहेर जाऊच शकत नाही. काही ढोंगी लोकांमुळे अशिक्षितांमुळे व जुन्या परंपरा आणि विचारसरणीमुळे अंधश्रद्धेचे प्रमाण वाढत जाते. समाजातील अज्ञानाचा फायदा घेवून विघातक वृत्तीकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी शासनाने २०१३ साली कठोर कायदा केला आहे. याचे संक्षिप्त नाव महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध कायदा, २०१३ असे आहे. विद्यार्थ्याला शिक्षकाने अंधश्रद्धेतून बाहेर काढल्यास तो विद्यार्थी आयुष्यात कधीच अयशस्वी होणार नाही.

# सावित्री-ज्योतीबांचे विचार फक्त शिक्षकच पुढे घेऊन जाऊ शकतात

पूर्वी बहुजन समाजाला शिक्षण घेण्यासाठी शाळेचे दरवाचे बंद असल्यामुळे बहुजन समाज अज्ञानाच्या चिखलात रूतून बसला होता त्यावेळी राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीमाई यांनी कर्मठ विकृतींना शह देत बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी शाळांची स्थापना केली परंतु आज त्याच शाळांमधून शिक्षण घेतलेल्यांना विद्येची देवता कोण ? असा प्रश्न विचारल्यास ते कोणताही सारासार विचार न करता सरस्वती हे उत्तर सांगून मोकळे होतात तेव्हा त्यांच्या बुद्धीची कीव येते.

त्यामुळे शिक्षक बांधवानी खरा इतिहास मुलांसमोर मांडण्याचा प्रयत्न करायला हवा. ज्या दिवशी शिक्षक शिक्षणाची देवता म्हणून सावित्रीमाईंच्या विचारांचे पुजन करून त्याचा प्रचार प्रसार होण्यासाठी प्रयत्न करतील त्या दिवशी सावित्रीमाईंना खरे अभिवादन ठरेल ...! आणि हा बदल फक्त शिक्षकच घडवू शकतात.

> "काळा रंग हा अशुभ समजला जातो, पण प्रत्येक काळा रंगाचा फळा हा 'आपल्या प्रत्येक विद्यार्थांचे आयुष्य उजळवत असतो."
>
> – भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

# पुर्वी शिक्षक हा केवळ शाळेचाच नव्हे तर गावाचा मार्गदर्शक होता

पुर्वी शिक्षकाचा शब्द प्रमाण मानला जात होता. गावात शिक्षकाला मान सन्मान होता. शिक्षक हाच गावाचा न्यायाधीश होता. आज मात्र तशी परिस्थिती राहिलेली नाही. पुर्वी शिक्षकाचा आदर कोणत्या कारणामुळे होत असेल तर ते आहे, त्याचे उत्तम चारित्र्य, आचार-विचार, निर्व्यसनीपणा, सोज्वळ राहणीमान, सत्याने मार्गक्रमण करणे आणि समाजाला सत्याची दिशा दाखवणे. परंतु आज काळ बदलला. समाज चंगळवादाच्या आहारी गेला. समाजासोबत काही शिक्षकही व्यसन करू लागली. बियरबार, हॉटेल्स मध्ये शिक्षकांची उपस्थिती समाजाला प्रश्न करायला संधी देणारी आहे. परंतु शिक्षकाने हे विसरता कामा नये की जसा शिक्षक तसा समाज हे समीकरण अत्यंत सत्य आहे.

# शिक्षकच नवीन समाजाची निर्मिती करू शकतो

शिक्षकाचे विचार हे परिवर्तनवादी असणे गरजेचे आहे. तो अंधश्रध्दाळू असता कामा नये. तो विज्ञानवादी असला पाहिजे, चिकित्सक विचाराचा असला पाहिजे. प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा करणारा असला पाहिजे. बालविवाहाचा विरोधक असला पाहिजे. सर्व धर्म समभाव व मानवतावादाचा पुरस्कार करणारा असला पाहिजे. त्याच्यात मैत्रीभाव असणे गरजेचे आहे. एकविसाव्या शतकाची कौशल्य त्याच्यात रुजली पाहिजेत. ती कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी धडपड करणारा असावा. स्त्रीशिक्षणाचा पुरस्कर्ता व स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी नेहमी प्रयत्न करणारा असावा. अशा या नवीन विचारांचा शिक्षकच नवीन समाजाची निर्मिती करू शकतो.

# ग्रामीणमधील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले पाहिजेत

ग्रामीणमध्ये मुलींची कमी वयात लग्न केली जातात आणि त्याचा परिणाम शिक्षणावर होतो. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे पालकांची मानसिकता बदलू शकते. पालकांची मानसिकता बदलली तर मुलींना उच्च शिक्षण घेता येईल. त्यामुळे सामाजिक वातावरण बदलेल. मुलगी म्हणजे काचेचे भांडे ही धारणा कुठेतरी पुसली जाणे गरजेचे आहे. शहरात जरी अशी परिस्थिती पहायला मिळत नसली तरी ग्रामीण भागात मात्र मुलींसाठी परिस्थिती अजुनही बदललेली नाही. महिला सक्षमीकरणासाठी एक ठोस कार्यक्रम शासन व शाळांच्या माध्यमातून ग्रामीण भागात सुरु होणे गरजेचे आहे. किमान त्या दिशेने प्रयत्न शिक्षक व शाळांच्या माध्यमातून होणे गरजेचे आहे. असे प्रयत्न झाल्यास मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत होईल.

## कुंपणापर्यंतचे शिकवायचे असेल तर शिक्षकाला क्षितिजापर्यंतचे ज्ञान असायला हवे.

चाणक्याचे असे विधान आहे की सर्वात श्रेष्ठ राजा नव्हे तर शिक्षक आहे कारण तो उद्याची पिढी घडवत असतो आणि महत्वाचा मुद्दा म्हणजे शिक्षक हा जन्मालाच यावा लागतो हुशार विद्यार्थीसुद्धा एक चांगला शिक्षक होईलच असे नाही. एक आदर्श शिक्षक हा कायम विद्यार्थी असायला हवा. शिकवायचा विषय हा आधी शिक्षकाला नीट समजलेला असायला हवा.

आपल्याला समजलेला विषय हा विद्यार्थ्यांना शक्यतो सोप्या भाषेत आणि उदाहरणे देऊन समजावून सांगण्याची हातोटी हवी. वर्गात बसलेले सर्व विद्यार्थी नसतात तर त्यातील बहुसंख्य केवळ परीक्षार्थी असतात त्यामुळे दोघांच्यात संतुलन ठेवत विषय कसा पुढे न्यायचा याची हातोटी शिक्षकाकडे हवी. सर्वात महत्वाचे म्हणजे कुंपणापर्यंतचे शिकवायचे असेल तर उत्तम शिक्षकाला क्षितिजापर्यंतचे ज्ञान असायला हवे.

## आजच्या मुलांची अवस्था सामानानी गच्च भरलेल्या पिशवी सारखी झाली आहे

एखाद्या पिशवीत सामान जास्त भरले तर पिशवी जड होते, वेडीवाकडी होते आणि कधी कधी फाटतेही. मग सामान कोणतेही असो. खेळणी असोत की खाद्य पदार्थ किंवा कपडे असोत. खेळण्यांनी पिशवीला आनंद मिळणार नाही किंवा खाद्यपदार्थाने पिशवीची भुक भागणार नाही. तीच गत आजच्या शिक्षणाने मुलांची झाली आहे. प्राथमिक शाळेपासून कॉलेजपर्यंत कुठलेही शिक्षण घ्या.

अनेक तऱ्हेची माहिती मेंदूला पुरवणे एवढेच त्याचे स्वरूप झाले आहे. मग त्या माहितीचा अर्थ समजो न समजो. फरक एवढाच की, कापडी पिशवीला मन नसते, भूक नसते, आनंददुःख नसते. पण शिकणाऱ्या मुलांना मन असते, आणि मनाला जिज्ञासेची भूक असते. शिक्षणाचे ओझे नको, आनंद हवा.

> ''परीक्षा नेहमी एकांतात असते, मात्र त्याचा परिणाम सर्वांसमोर असतो. म्हणून कोणतेही कार्य करण्याअगोदर, त्याच्या परिणामाचा विचार नक्की करायला हवा.''
>
> – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# मुलांवर चांगले संस्कार २१ वर्षापर्यंत केले जाऊ शकतात.

दर सात वर्षांनी माणसाच्या शरीरातील पेशींचे चक्र बदलते, हा महत्वाचा संदर्भ बायलॉजीमध्ये आढळतो. सात वर्षापर्यंत मुले आई वडीलांच्या धाकात असतात. ८ ते १४ या वयात त्यांना हळूहळू स्वतःची मते बोलण्याची सवय लागते. १५ ते २१ या वयात मेंदूवाढीची सीमा गाठली जाते. त्यानंतर मेंदूतील पेशी वाढत नाहीत. एखाद्या कैरीची वाढ होता होता ती आकाराने मोठी होते. पण विशिष्ट आकार धारण केल्यानंतर त्या आंब्याची गोडी वाढते; पण आकार नाही, गुण वाढत राहतात. अनुभव वाढत राहतो. म्हणजे मुलांवर जे काही संस्कार करायचे ते पहिल्या तीन पातळ्यांवर केले पाहिजेत. पहिल्या सात वर्षात मुलांवर चांगले संस्कार होणे गरजेचे आहे. पालकांना विनंती की आपण मुल हे आपण हौसेने वाढवतो. त्याऐवजी थोडे ज्ञानाने वाढवावे. संस्काराच्या अन्नाने त्याचे पोषण करावे.

# सत्य बोलणे, सत्य वागणे हे संस्कार मुलांमध्ये लहानपणापासून रुजवावे लागतात

सत्य बोलणे, सत्य वागणे हा संस्कार मुलांना जाणीवपुर्वक घरातूनच मिळाला पाहिजे. पालक घरात असताना, बाहेरून भेटावयास येणाऱ्या व्यक्तीला भेटण्याची इच्छा नसते, पालक पाल्याला सांगतो त्यांना सांग बाबा घरात नाहीत. दिसावयास प्रसंग शुल्लक; पण पाल्याच्या मनावर, व्यवहारातल्या वागणुकीवर याचा दूरगामी अयोग्य परिणाम होतो. व्यसनांचेही तसेच धुम्रपानाचे व्यसन असणारा पालक, बिनदिक्कत पाल्याला तंबाखू, विडी/सिगारेट विकत आणावयास दुकानात पाठवतो.

पाल्यासमोर धुम्रपानानंद घेण्यास त्याला संकोच वाटत नाही, अशा वेळी पाल्याला एखाद्या वेळी विडी, सिगारेटचा एखादा झुरका घेण्याचा मोह झाल्यास पाल्याचा काय दोष ? मुलांवर चांगले संस्कार होण्यासाठी पालकांचे चांगले वर्तन असले पाहिजे.

"शिक्षण ही पवित्र संस्था आहे.
शाळेत मने सुसंस्कृत होतात.
शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र आहे."

– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# आम्ही कसेही असू पण आमची मुले मात्र आदर्श असली पाहिजेत

आम्ही कसेही असू पण आमची मुले मात्र चांगली झालीच पाहिजेत असे जवळपास सर्वच पालकांना वाटते. परंतु पालकांनी केलेली प्रत्येक कृती मुले लहान वयात काळजीपूर्वक पाहत असतात व त्यातून स्वत:चा निष्कर्ष काढत असतात. मुलांना विश्वासात घेऊन चर्चा केल्यास मुले सांगतात, आजी- आजोबांशी आई ज्याप्रमाणे वागते, बोलते ते बरोबर नाही. वडीलही फारशी आत्मीयता दाखवत नाहीत, हे आम्हा मुलांना खटकते; पण काही बोलता येत नाही.

तसेच आई-वडील सतत भांडत असतात त्यामुळे अभ्यासात लक्ष लागत नाही. शाळेतही तेच विचार मनात येतात. आई-वडीलांच्या भांडणाचे एक जबरदस्त दडपण मुलांवर असतं. त्यामुळे मुलांमध्ये भयगंड निर्माण होतो. म्हणून मला वाटते मुलांवर जर चांगले संस्कार व्हावे असे आपणांस वाटत असेल तर अगोदर पालकांनी आपल्या वागण्यात बदल करायला हवा आणि मग मुलांकडून अपेक्षा ठेवायला हरकत नाही.

# आजची मुले कुटुंबीयांच्या अपेक्षेमुळे गुदमरून जात आहेत

आपला मुलगा हुशार असला की आईवडिलांना साहजिकच अभिमान वाटतो. परंतु मुलांची प्रकृती, त्यांचा बदलता स्वभाव, त्यांच्या बदलत्या आवश्यकता, यापेक्षा त्याच्या मार्कावर लक्ष ठेवूनच साऱ्या कुटुंबाचे काम चालते. नव्वद टक्के आणि त्याच्याही पलीकडे पोहोचलेला मुलगा या कुटुंबीयांच्या अपेक्षेने गुदमरून जातो. त्या अपेक्षेचे ओझे घेऊन त्याला आपली घोडदौड कायम ठेवावी लागते.

होमवर्क, वाचन, स्पेशल क्लासेस, व्हेकेशन क्लासेस, स्कॉलरशिप परीक्षा, या सगळ्यांनी घेराव घातलेला तो मुलगा; त्याला थांबायला उसंत मिळत नाही. तो दमला तरी त्याच्या भोवतालच्या अपेक्षा त्याला दम देत राहतात. याचा परिणाम त्या मुलाच्या मानसिकतेवर होतो, त्याचा ताण वाढतो आणि मग सहन न झाल्यास कधी कधी मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागतो. त्यामुळे मला वाटते पालकांनी यावर आत्मचिंतन करायला हवे.

> "शिक्षण हे सर्वात प्रभावी हत्यार आहे, ज्याचा उपयोग तुम्ही जग बदलण्यासाठी करू शकता."
>
> – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# एकाग्रता वाढविण्यासाठी एक प्रयोग

पंढरपूरचा पांडुरंग आपल्या सर्वांचे श्रध्दास्थान आहे, एकाग्रता वाढविण्यासाठी रोज १२ मिनिटे कोणत्याही सोईच्या वेळी डोळे बंद करून पांडुरंगाची मुर्ती आपल्या स्वतःचा टाळूवर उभी आहे अशी कल्पना करावी. पांडूरंग मुर्ती डोक्यावर स्थिर होत नाही असा काही काळ अनुभव येईल. पण नंतर ती मुर्ती जड होत गेल्याचा अनुभव, किंचित वेदना, पण नंतर त्या सुखकारक होऊन मुर्ती एकाएकी हलकी झाल्याची स्थिती निर्माण होईल. त्यानंतर पांडूरंगाच्या मुर्तीशी आपण एकरूप होत असल्याचा अनुभव येईल. अशा या कृतीमध्ये सातत्य ठेवल्यास आपली एकाग्रता वाढण्यास मदत होईल. मुलांसह पालकांना देखील याचा खूप फायदा होईल.

या धावपळीच्या जीवनात आपली मानसिकता अशी झाली आहे की एकाग्र होणे इतक सोप नाही. तरीही प्रयत्न केल्यास काहीच अशक्य नाही.

## क्षमता एकाग्र सराव व सातत्य

मुलांमधील क्षमता विकसित करायची असेल तर त्या क्षमतेचा प्रत्यक्षात वापर करणे आवश्यक आहे. उदा. आपल्या मुलांमध्ये पोहण्याची क्षमता आहे परंतु प्रत्यक्ष पाण्यात पडले तरच पोहता येईल. विशिष्ट तऱ्हेने हात-पाय हलवले पाहिजेत तरच आपला पोहण्याचा हेतु साध्य होईल. साधेसोपे व ठोकळेबाज काम करून क्षमता व गुणवत्ता वाढत नाही; तर गुंतागुंतीच्या होत जाणाऱ्या समस्यांच निराकरण करताना, नवनवी आव्हाने पार पाडताना आपल्या क्षमतांचा विस्तार व विकास होतो.

त्याचबरोबर आणखीन एक महत्वाची गोष्ट म्हणजे, काही वेळा चंचलपणामुळे व अन्य सुखाच्या मोहामुळे ठरवलेले वेळापत्रक पाळले जात नाही वेळेचा अपव्यय होतो. आपण तो टाळला पाहिजे. तसेच ठराविक काळानंतर वेळापत्रकाप्रमाणे आपला अभ्यास, ठरवलेल उद्दिष्ट कितपत साध्य झाले किंवा नाही, याचे आत्मपरीक्षण केल पाहिजे. म्हणून मला वाटते वरील सर्व गोष्टी एकाग्रता सराव व सातत्य असल्याशिवाय शक्य होत नाहीत.

"कासवाच्या गतीने का होईना,
पण रोज थोडी थोडी प्रगती करा,
खुप ससे येतील आडवे,
बस त्यांना हरवायची हिम्मत ठेवा."

# मेंदूवरील ताण कमी करण्यासाठी...

विद्यार्थी अवस्थेत साधारण तीन ताण असतात– अभ्यासाचा ताण, अपेक्षांचा ताण, यश मिळेल किंवा नाही याचा ताण. आयुष्यात यशस्वी व्हायच असेल तर तणावमुक्त जीवन जगणे याचे नियोजन करता येणे गरजेच आहे.

मुलांनी प्रयत्नाकडे लक्ष द्यावे यश अपयशाची चिंता करू नये. १०० टक्के प्रयत्न करतो की नाही ते पाहावे. प्रयत्न केले तर यश मिळणारच. सलग एक तास अभ्यास केल्यानंतर किमान १५ मिनिटांचा ब्रेक घेऊन मनोरंजनाच्या गोष्टी कराव्यात, खेळावे. पुरेशी विश्रांती घ्यावी. रोज किमान सात तास झोप घ्यावी. पाणी पिण्याने मेंदूवरील आलेला ताण कमी होण्यास मदत होते. दिर्घश्वास घेतल्याने मेंदूला ऑक्सीजन पुरवठा पुरेसा होतो व त्यामुळे मेंदूचे चलनवलन वाढून थकवा कमी होतो. अनुलोम–विलोम प्राणायामाची सवय उपयोगी पडते. ध्यानाची सवय ठेवली तर शांतीचा अनुभव येऊन ताण कमी होतो. आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांनी तणावमुक्त राहीले पाहिजे. त्यासाठी पालकांनीही मुलांना मार्गदर्शन केले पाहिजे.

# अभ्यासाची छान सुरुवात करण्यासाठी...

- उत्सुकता : अभ्यासात चित्त लागण्यासाठी पहिली आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे उत्सुकता.
- नियमितपणा : कोणतीही गोष्ट जर तुम्ही नियमित करत असाल तर काही दिवसांनी शरीराला त्या गोष्टीची सवय होऊन जाते.
- प्रेरणा : अभ्यास असो वा इतर कोणतेही कार्य त्याला उत्कृष्ट पद्धतीने करण्यासाठी प्रेरणेची आवश्यकता असते.
- आत्मचिंतन : आपण जो अभ्यास करतो आहे तो कितपत आपल्याला समजला किंवा लक्षात राहिला याचे चिंतन करणे आवश्यक आहे.
- मनाची एकाग्रता : सर्वात शेवटची आणि महत्त्वाची गोष्ट आहे एकाग्रता. कोणतीही गोष्ट पूर्ण एकाग्रतेने केल्यास त्याचे लाभ नक्कीच होतात.

# बौद्धिक विभाजन नको...

आज प्रत्येक विद्यार्थ्याने 'अप–टू–डेट' राहणं ही काळाची गरज आहे. त्यांना 'अप–टू–डेट' ठेवणं हे आपल्या शिक्षण संस्थेचं कर्तव्य आहे. त्यासाठी योग्य ते पाऊल उचलणं गरजेचं आहे. कित्येक शाळेत आपण पाहतो की विद्यार्थ्यांचे त्यांच्या बौद्धिक गुणवत्तेनुसार विभाजन केलं जातं. या विभाजनामुळे होतं असं की, हुशार विद्यार्थी हा आणखीन हुशार होतो आणि सरासरी बौद्धिक पातळी असलेला विद्यार्थी हा आणखीन खचत जातो. यामुळे या विद्यार्थ्याची पात्रता असूनसुद्धा तो मागेच राहतो. माझ्या मते, प्रत्येक विद्यार्थी हा अद्वितीय आहे. त्यांच्यात पक्षपात होऊ नये.

# ध्येय निश्चित नसेल तर कॅप्टन नसलेल्या जहाजाप्रमाणे आपली अवस्था होईल

एक शिव भक्त अनेक दिवसापासून रोज मंदिरात जातो असतो व शिवजींना प्रार्थना करीत असतो की, हे शिवजी मला लॉटरी लागू दे! एके दिवशी शिवजींच्या धर्मपत्नी पार्वती यांच्या कानावर ही प्रार्थना पडते, तेंव्हा त्या लगेच शिवजींना म्हणतात की, अहो, तुमचा हा भक्त एव्हढा तळमळीने तुमची प्रार्थना करतोय, देऊन टाका ना त्याला एक लॉटरी. तेंव्हा शिवजी म्हणाले अगं, मी तर देण्यासाठीच बसलोय, परंतु त्याला कोणती आणि किती किमतीची लॉटरी हवी आहे ? ती तर त्याने आधी बाजारातून विकत तर घ्यायला पाहिजे ना !!

मित्रांनो, आपल्यापैकी बऱ्याच लोकांची त्या शिवभक्तासारखीच परिस्थिती आहे, आम्हाला पाहिजे तर खूप काही, परंतु नेमके काय पाहिजे हेच माहीत नाही. आपल्याला आपल्या जीवनात नेमके काय पाहिजे आहे म्हणजेच ध्येय निश्चित केले नसेल तर काय मिळणार? तर काहीच नाही. पत्ता न लिहिलेले पत्र कुठेच पोहोचत नाही तसेच कॅप्टन नसलेले जहाज समुद्राच्या लाटांमुळे एकतर बुडते किंवा एखाद्या हिमनगावर आदळून नष्ट होते. जहाजाप्रमाणे आपली अवस्था होऊ नये याची काळजी घ्यावी.

## मुलाच ध्येय पालकांनी निश्चित करू नये

समजा आपण पहिलीच्या वर्गात आहोत पहिलीच्या वर्गात असताना आपले आई-वडील आणि आजी आजोबा आपल्याला सांगतात की माझा मुलगा डॉक्टर आणि इंजिनिअर होणार आहे तेव्हा आपल्या डोक्यामध्ये फक्त डॉक्टर आणि इंजिनिअर या दोनच गोष्टी असतात आणि त्याप्रमाणे आपली जडणघडण होत असते. मागील २१ वर्षापासून मी शैक्षणिक क्षेत्रात काम करत आहे तेव्हा मला असं जाणवलं आई वडिलांची स्वप्न फक्त डॉक्टर आणि इंजिनिअर यापलीकडे नसतात. प्रत्यक्षात जर पाहिल तर त्या मुलांची कॅपॅसिटी पालक पाहत नाहीत त्यामुळे मुलांचं येथेच नुकसान होत असतं.

काही मुलांची मेंटल एबिलिटी नसताना त्या मुलांना डॉक्टर इंजिनिअर बनण्यासाठी तासन तास वेगवेगळ्या पद्धतीचे क्लासेस लावले जातात, ट्युशन लावल्या जातात. परंतु त्याच्या बुद्धीची पातळी लक्षात न घेतल्यामुळे पुढे काही मुल डिप्रेशनमध्ये जातात. अक्षरशः मी अशी मुलं पाहिलेली आहेत की त्यांना शाळा आणि ट्युशनच नाव जरी काढल तरी त्यांच्यामध्ये चीड निर्माण होते.

# १० वी नंतर पुढे काय.....

इयत्ता १० वी हा मुलांना करिअरमधील सर्वात महत्त्वाचा आणि गोंधळात टाकणारा टप्पा आहे. दहावीनंतर, योग्य प्रवाहाच्या निवडीमागे कोणता प्रवाह इतरांपेक्षा चांगला आहे हे ठरवणे अनेकदा विद्यार्थ्यांना अवघड जाते. कोणत्या प्रवाहात त्यांना अधिक गुण मिळवणे सोपे जाईल. कोणता प्रवाह त्यांना त्यांचे ध्येय आणि नोकरी साध्य करण्यासाठी मदत करेल. यासाठी कॅरिअर सल्लागारासह करिअर समुपदेशन घेऊन आपण आपले विषयाची निवड करण्याबाबतचे गोंधळ दूर करू शकतो. आज दहावीच्या मुलांसाठी करिअर मार्गदर्शन ही काळाची गरज आहे. १० वी नंतर प्रवेश घेताना मित्रांनी सायन्सला प्रवेश घेतला म्हणून मी घेतला हा निर्णय चुकीचा ठरू शकतो. आपला मित्र कोणता पर्याय निवडातो हे पहाण्या ऐवजी आपली आवड कशात आहे त्याच पर्यायाची निवड करावी.

१० वी नंतर करिअर निवडताना पालक तसेच सामाजिक दबाव मुलांवर असतो, अनेक पालक त्यांच्या मुलांवर त्यांना आवडेल किंवा समाजात कशाला महत्त्व आहे असे पर्यायाची निवड करण्यास मुलांवर दबाब टाकतात. दबाबाखाली येऊन विद्यार्थी असे पर्याय निवडतात ज्यांच्यात त्यांना रुची नसते. नंतर हे समजायला फार उशीर होतो की आपण निवडलेले पर्याय चुकीचे आहेत. पूर्वी ज्ञानाच्या अभावामुळे १० वी नंतरचे पर्याय निवडण्यात चुका होत असायच्या पण आता सगळं काही बदललं आहे. दहावी उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांच्यासमोर सर्वात मोठा प्रश्न उभा राहतो की, विज्ञान, वाणिज्य आणि कला या तीनपैकी कोणत्या शाखेला प्रवेश घ्यावा. त्याचप्रमाणे दुसरा पर्याय देखील आहे ज्याला तुम्ही प्रोफेशनल कोर्स देखील म्हणू शकता. पुढील भागामध्ये सदरील माहिती जाणून घेऊयात.

# १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर विज्ञान(सायन्स) पर्याय निवडला तर...

१० वी उत्तीर्ण झाल्यानंतर मुलांना विज्ञान (Science) हा एक अतिशय आकर्षक पर्याय आहे आणि हा पर्याय बरेच विद्यार्थी निवडतात पालकांचीही तशीच इच्छा असते. याचे कारण कदाचित विज्ञान प्रवाह त्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय, आयटी आणि संगणक या सारखे उत्तम करिअर पर्याय निवडता येतात. प्रत्येकाने विज्ञानाची निवड करणे महत्त्वाचे आहे, या मध्ये नोकरीसाठी जास्तीत जास्त पर्याय खुले आहेत. विज्ञान शाखेचा आणखी एक फायदा म्हणजे तुम्हाला कला शाखेत बदली करायची असली तरी ती करता येते आणि वाणिज्य शाखेत बदली करायची असेल तरी ते करू शकता, परंतु कला किंवा वाणिज्य शाखेतून विज्ञान शाखेकडे जाता येत नाही.

# आजचे विज्ञान उद्याच्या तंत्रज्ञानाचा आधार आहे

आजचे विज्ञान उद्याच्या तंत्रज्ञानाचा आधार आहे, म्हणूनच १० वी नंतर सर्वोत्तम विज्ञान प्रवाह असलेल्या अभ्यासक्रमांना प्रथम प्राधान्य दिले जाते. जर तंत्रज्ञान तुमचा आवडता विषय असेल तर दहावीनंतर विज्ञान शाखेचा प्रवेश हा एक चांगला पर्याय आहे. तुम्ही भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (PCM) या विषयांची निवड करू शकता. जर आपणास वैद्यकीय क्षेत्राची आवड असेल तर तुम्ही भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (PCB) या विषयांची निवड करू शकता. असे काही विद्यार्थी असतात की त्यांना दोन्ही ग्रुप ठेवायचे असतात म्हणजेच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व जीवशास्त्र (PCMB); परंतु दोन्हीही ग्रुपमुळे मुलांना अभ्यासाचा ताण येऊ शकतो. १२ वी सायन्ससाठी क्रॉप सायन्स व कॉम्प्युटर सायन्स हे दोन पर्याय मुलांसाठी उपयुक्त आहेत. त्याची माहिती आपण पुढील भागात पाहुयात.

# विज्ञान(सायन्स) शाखेसाठी क्रॉप सायन्स व कॉम्प्युटर सायन्स हा उत्तम पर्याय

आपण मागील भागात पाहिले की ११ वी व १२ वी सायन्स शाखेमध्ये PCB व PCM हे दोन ग्रुप असतात. जर आपण PCB ग्रुप ठेवला तर आपणास क्रॉप सायन्स हा स्कोरिंगसाठी विषय घेता येतो व PCM ग्रुप ठेवला तर कॉम्प्युटर सायन्स हा स्कोरिंगसाठी विषय घेता येतो. क्रॉप व कॉम्प्युटर हे दोन्हीही विषय विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त आहेत. या विषयांचा पहिला फायदा असा की कृषी व कॉम्प्युटरची आपणांस चांगल्या पद्धतीने माहिती होते व दुसरा फायदा जो की आपल्या इयत्ता १२ वी च्या मार्कांचा टक्का वाढण्यासाठी होतो. क्रॉप व कॉम्प्युटर हे दोन्हीही विषय २०० मार्कांचे असुन मराठी किंवा हिंदी भाषाविषय घ्यायची आवश्यकता नाही. पूर्वी हे विषय घ्यायचे म्हटल की शहराच्या ठिकाणी जाव लागत असे; परंतु आज हे विषय अगदी ग्रामीण भागातील ज्युनिअर कॉलेजमध्येही उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा.

"जेंव्हा सगळच संपून गेलंय
असं आपल्याला वाटतं,
तीच खरी वेळ असते
नविन काहीतरी सुरू करण्याची."

# १० वी नंतर कला(आर्टस्) किंवा वाणिज्य(कॉमर्स) शाखेतही विद्यार्थी छान करिअर करू शकतात

कला शाखेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यापक पार्श्वभूमी मिळाली आहे. तुम्हीं तुमच्या संभाषण कौशल्यात प्राविण्य मिळवून अधिक बौद्धिक लवचिकता आणून ती विकसित करू शकता. विज्ञान शाखेप्रमाणे यातही अनेक पर्याय खुले आहेत. संशोधन, टीचिंग, पत्रकारिता, समाजकार्य, शासन, व्यवस्थापन, टेलिव्हिजन अँड रेडिओ, प्रसारण माध्यम, कॉर्पोरेट आणि तांत्रिक कम्युनिकेशन्स, पब्लिक रिलेशन्स अशा अनेक पदवीधर किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थी करिअर करू शकतात. तसेच वाणिज्य (कॉमर्स) विषय हा एक असा मार्ग आहे की ज्यामध्ये विद्यार्थ्यांना व्यापार आणि व्यवसायाचा अभ्यास करावा लागतो. जे विद्यार्थी वाणिज्य शाखेची निवड करतात ते फायनान्स प्लॅनिंग, अकाउंटन्सी, टॅक्स प्रॅक्टिशनर्स, ब्रोकिंग, बँकिंग यापैकी कोणत्याही क्षेत्रात आपले करिअर करू शकतात. तसेच चार्टर्ड अकाउंटंट, एमबीए, इत्यादी करिअरचे पर्याय आहेत.

# मुलांना लहानपणापासूनच वेगवेगळ्या क्षेत्राची ओळख करून दया

लहान मुलांना प्रत्येक गोष्टीचे प्रचंड कुतूहल असते. याच कुतूहलाचा वापर करून त्यांना कळायला लागल्यापासून वेगवेगळया क्षेत्रांची ओळख करून द्यायला सुरुवात करावी. म्हणजेच मुलांना साधारण लिहिता-वाचता आले की त्यांच्यापेक्षा लहान भावडांना काही तरी शिकवायला सांगावे. तसेच ठराविक रक्कम देऊन त्यातून काही खरेदी करायला सांगून सगळ्या खरेदीचा जमा खर्च पध्दतीने हिशोब लिहायला सांगावा. कधी कधी तुमचा महिन्याचा खर्च मुलाकडून मुद्दाम एक्सेलमध्ये लिहून घ्यावा, तसेच त्यांच्याकडून बँकेच्या स्लीप भरून घ्यावी, मुले मोठी असतील तर आपल्या देखरेखीखाली त्यांना बँकेत पैसे भरायला लावावे. तसेच घरामध्ये आईला सर्व कामामध्ये मदत करायला सांगावी. अशी वेगवेगळी कामे मुलांकडून करून घेतल्यास त्यांची निर्णय क्षमता वाढेल व त्याचा त्यांना करिअर निवडीसह भावी आयुष्यात उपयोग होईल. आणि या सर्व अनुभवावरून आपल्याला मोठे होऊन काय व्हायला आवडेल याचा विचार ते करू लागतील.

# मुलांना 'स्पून फिडिंग' करू नका

आपल्या मुलांना वेगवेगळ्या क्षेत्राची ओळख करून देणे हे पालकांचे कर्तव्य आहे. त्यानंतर जशी जशी मुले मोठी होतील त्यांना आवडीनिवडी समजतील तस तसे त्यांना नेमके काय करायचे, काय नाही त्याबद्दल कल्पना येत राहिल. तुम्ही पालक म्हणून एकदा त्यांना वाट दाखवली की त्यांना स्वतंत्रपणे चालु दया. त्यांच्या अडीअडचणीला त्यांना मदत करा, त्यांचे काही चुकत असेल तर त्यांना बरोबर मार्ग दाखवण्यासाठी मार्गदर्शन करा. परंतु रेडीमेड काहीही देऊ नका. तसेच मुले चुकूच नयेत, त्यांना काही अडचणी येऊच नयेत असा विचार पालक करत असतील तर मात्र हा विचार पालकांनी टाळला पाहिजे. कारण चुकल्याशिवाय मुलांची निर्णय क्षमता वाढणार नाही. मुलांना मार्ग दाखवला की त्यांना त्यावरून वाटचाल करू द्यावी. आपण हात धरून न्यायचे नाही कारण आपण सतत मदत करत राहिलो तर मुलांचा मानसिक विकास होणार नाही तसेच निर्णय क्षमता वाढणार नाही. आपण पालक म्हणून लांब अंतरावरून बघत रहायच जेणेकरून त्यांना गरज लागली तर मदत करता येईल.

## मुलांशी चर्चा करा, मुलांचे गुण ओळखा

आईवडीलांना लहानपणीच मुलांची गती कशात आहे ते समजते. यावरून मुलांना करिअरची ओळख करून द्यायला सोपे जाते. उदा. एखादे मुल गणितात चांगले असेल तर त्याला इंजिनीअर होण्याचा सल्ला दिला जातो, मुलेही नकळत त्या दिशेने विचार करायला लागतात. मुलांना ज्या विषयाची आवड आहे त्यानुसार करिअर मार्गदर्शन करावे. तसेच तुमच्या स्वतःच्या शिक्षणाबद्दल, नोकरीबद्दल मुलांशी चर्चा करा. एखादा असा प्रसंग असेल की ज्यात तुम्हाला तुमच्या कामामुळे यश मिळाले, असे प्रसंग मूलांसोबत शेअर करा. तुम्ही यश संपादन करण्यासाठी काय प्रयत्न केले, कसे काम केले, किती कष्ट घेतले हे सुध्दा मुलांना सांगा. आई बाबांचे ऑफिस किंवा इतर कोणत्याही ऑफिसला भेट देऊन तिथले काम मुलांना समजावून सांगा. हा सर्व अनुभव मुलांना करिअर निवडीसाठी उपयोगात येईल.

> ''छत्री पावसाला थांबवु शकत नाही,
> पण पावसात थांबण्याचे धाडस नक्की देऊ शकते,
> तसेच आत्मविश्वास यशस्वी होण्याची खात्री देऊ शकत नाही,
> पण संघर्ष करण्याची प्रेरणा नक्की देऊ शकतो.''

# १० वी नंतर आयटीआय हा उत्तम पर्याय

ग्रामीण भागासह शहरी भागातही अनेकदा असे दिसून येते की १० वी झाल्यानंतर बरीचशी मुले परिस्थितीमुळे रोजंदारीवर कामाला जायला सुरुवात करतात. मुलांकडे स्कील असुनही मार्गदर्शन नसल्यामुळे मुलांना रोजंदारी करावी लागते. अशा मुलांना माझा सल्ला असेल की दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबरोबर आयटीआयच्या कोर्सेसला प्रवेश घ्यावा. महाराष्ट्रात जवळजवळ प्रत्येक तालुक्यात शासनाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत जेणेकरून सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येईल आणि नंतर त्यांना स्वतःसाठी नोकऱ्या मिळतील किंवा व्यवसाय सुरू करता येईल.

आयटीआय मध्ये इलेक्ट्रीशियन, प्लंबर, फाउंड्री मॅन, वायरमन, टर्नरवेल्डर, मोल्डर, नेटवर्क तंत्रज्ञ, कॉम्प्यूटर हार्डवेअर, मोटार मेकॅनिक इत्यादी कोर्सेस उपलब्ध आहेत. तसेच केंद्र सरकारचे किमान कौशल्यावर आधारित अगदी ६ महिन्यापासून ते दोन वर्षापर्यंतचे मोफत कोर्सेस उपलब्ध आहेत.

# विद्यार्थी ते परीक्षार्थी यामध्ये मुलांचे बालपण हिरावून घेतलं जातय ?

आजची परिस्थिती पाहिली असता जिथं मूल अजून आपल्या मातृभाषेशी एकरूप झालेलं नसतं तिथं त्याला शालेय प्रवेशासाठी परीक्षा द्यावी लागते. अगदी वयाच्या तिसऱ्या वर्षापासून सुरू होणारी परीक्षा शिक्षण पूर्ण होऊन नोकरी मिळेपर्यंत सुरूच असते.. प्रत्येक वेळी परीक्षेचीच चिंता आणि प्रत्येक क्षण परीक्षेचाच. आपला पाल्याला शिक्षणाच्या सर्व सोयी–सुविधा पुरवण्यासाठी पालकांची धडपड सुरू असते. कारण आपल्याला आवश्यक त्या सोयी–सुविधा मिळाल्या नाहीत त्यामुळे आपण शिकू शकलो नाही या गोष्टीची खंत बऱ्याच पालकांना असते.

आपल्या राहिलेल्या इच्छा आपल्या मुलांनी पूर्ण कराव्यात ह्यासाठी ते धडपडत असतात. आपल्याला जो संघर्ष करावा लागला तो आपल्या मुलांना करावा लागू नये, त्यांनी चांगलं शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभं रहावं ही तळमळदेखील त्यापाठीमागे असते. आणि त्यातूनच सुरू होते स्पर्धा.. आणि इथूनच विद्यार्थ्यांचा परीक्षार्थी बनवण्याची देखील सुरुवात होते हे पालकांच्याही लक्षात येत नाही.

# शिक्षणाचा वापर जर व्यवहारात करता येत नसेल तर त्या शिक्षणाचा उपयोग शून्यच.

प्रत्येक विद्यार्थी अभ्यास करून परीक्षेत यशस्वी होत असतो पण जे काही शिक्षण घेतलं असेल त्याचा व्यवहारात वापरच करता येत नसेल तर त्या शिक्षणाचा उपयोग शून्यच. म्हणून यासाठी एक उदाहरण सांगावस वाटत की ९० टक्के मिळवणारा मागे राहतो आणि ७० टक्केवाला त्याच्या पुढे जातो. आज समाजामध्ये वावरताना एक गोष्ट प्रकर्षानं जाणवतेय की काही मुल अगदी १०वी, १२वी किंवा फारतर पदवीपर्यंत शिकलेले असतात. तेवढ्या शिक्षणावर ते एखादी कंपनी चालवत असतात. आणि ८०-९० टक्के गुण मिळवून इंजिनीअर वगैरे झालेली मुलं त्यांच्या ऑफिसमध्ये नोकरी करत असतात. याचं कारण एकच. ज्यावेळी ही मुलं परीक्षार्थी बनून गुण मिळवण्याच्या स्पर्धेत धावत असतात त्यावेळी आताचे त्यांचे बॉस खरेखुरे विद्यार्थी बनून बाहेरच्या जगातले व्यवहार शिकत असतात. त्यामुळे पालकांनी लक्षात घ्यायला हवे की शिक्षणासोबत व्यवहारिक नॉलेजही महत्वाचे आहे.

# मुले खूप शिकली परंतु शिक्षण वापरायचे कुठे हेच समजले नाही...

गुरूकुलातील तीन शिष्य आपल शिक्षण पूर्ण करून जंगलामधून चालले होते. सूर्यही आता हळुहळु मावळतीकडे चालला होता. जाताना एका झाडाखाली त्यांना एक हाडाचा सापळा दिसला. ते तिघेही त्या हाडाच्या सापळयाजवळ गेले. त्या तिघांपैकी एक जण म्हणाला मी माझ्या विद्येच्या जोरावर हे सांगू शकतो की हा सापळा सिंहाचा आहे. आता दुसरा शिष्य म्हणाला मी माझ्या विद्येच्या जोरावर हा मेलेला सिंह जिवंत करतो व तो मंत्र वगैरे पुटपुटु लागला. तिसरा शिष्य पटकन धावत जावून झाडावर चढून बसला. आता इकडे सिंह जिवंत झाला व त्याने त्या दोघांजणांना फाडून टाकले. मित्रांनो अशीच अवस्था आजकालच्या विद्यार्थ्यांची आहे. कारण ते खूप शिकतील पण नेमकं शिक्षण वापरायच कुठं हेच त्यांना समजत नाही. याला कारण म्हणजे जे शिक्षण शिकून आपण आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण करायला हवा होता नेमका तोच करायला विसरलो आणि आयुष्यभर फक्त गुणांच्या (मार्क्सच्या) मागे धावत सुटलो. त्यामुळे आमचे मार्क्स वाढले, आमचे शिक्षणही वाढल मात्र आमचे व्यवहारिक ज्ञान शुन्य राहिले.

# विद्यार्थी हा राष्ट्राचा आधार स्तंभ असतो...

देशाचा मान, सन्मान, गौरव विद्यार्थ्यांवरच आधारित असते, कोणत्याही राष्ट्राची नीति, अवनीति या विद्यार्थ्यांवरच अवलंबून असते. कारण हेच विद्यार्थी देशाचे भविष्य घडवितात तसेच पुढच्या पिढीकरिता एक आदर्श आणि प्रेरणा देखील असतात. विद्यार्थी जीवनात अनेक प्रभाव पडलेले दिसुन येतात, कारण याच वयात चांगल्या वाईट गोष्टी आत्मसात होत असतात. ते म्हणजे स्वत:प्रति, कुटुंबाप्रति, समाजाप्रति पर्यायाने देशाप्रति, धड्पडण्याची जिद्द आणि समाजात स्वत:चे एक आदर्श व्यक्तिमत्व प्रस्थापित करणे किंवा समाजाला एक नवी दिशा देण्याचे काम हे विद्यार्थ्यांचे असते कारण की कोणताही थोर महापुरुष जेंव्हा घड़तो तेव्हा त्यांच्या विद्यार्थी दशेतच त्यांना एक असीम प्रेरणा मिळाली असते आणि या काळात त्यांच्यावर झालेले संस्कार, सोपस्कार देखील महत्वाची भूमिका बजवतात त्याकरिता आपल्याला बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, लालबहादुर शास्त्री, सुभाष चंद्र बोस, महात्मा फुले इत्यादी उदाहरणे देता येतील.

परंतु आज विद्यार्थी कसा घडवा, कसा असावा, जेणेकरून तो या देशाच्या येणाऱ्या पिढीला राष्ट्रवाद, देशसेवा, सामाजिक बांधिलकी, दायित्व इत्यादि बाबी शिकवेल. परंतु असल्या गोष्टी पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ट केल्या जात नाही कारण की, आजचे शिक्षण हे स्पर्धेवर आधारित आहे (रेस का घोड़ा आपण ज्याला म्हणतो) म्हणजे मुलाने इंजीनिअर, डॉक्टरच व्हावे, एखाद्या आईटी कंपनी मध्ये गलेलट्ठ पगाराचा जॉब करावा आणि आपली लाइफ सेटल करून घ्यावी इथपर्यंत आजच्या पालकांची मानसिकता होऊन बसली आहे.

# विद्यार्थी हा खूप महत्त्वाचा विषय आहे

विद्यार्थी हा विषय खूप महत्वाचा आहे, म्हणून पालकांनी वेळेत मानसिकता बदलली पाहिजे. वेळेनुसार बदलले नाही तर वेळ बदलण्याची दुसरी संधी देत नाही, कारण वेळ कधीच कुणासाठी थांबत नाही. त्यामुळे पालकांनी लक्षात घ्यायला हवं की प्रत्येक विद्यार्थ्याची बुद्धिमत्ता वेगवेगळी असते म्हणून प्रत्येक मुलगा डॉक्टरच होणे शक्य नाही. आजच्या या स्पर्धेत काही मुल विनाकारण लोटली जात आहेत आणि त्यांचं पुढं काय होत हे आपल्याला माहिती आहेच कारण आपण तेवढे जाणते आहात..!

"आयुष्यात एकदातरी वाईट दिवसांना सामोरे गेल्याशिवाय
चांगल्या दिवसाची किंमत कळत नाही."

ओमसाई शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

# श्री शिवाजी महाविद्यालय, परंडा.

संलग्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## बी.सी.ए.
(पदवी कोर्स)

कालावधी : ३ वर्ष | प्रवेश क्षमता : ६०

पात्रता : १२ वी पास (आर्ट, कॉमर्स व सायन्स)

## बी.एस्सी. (C.S.)
(पदवी कोर्स)

कालावधी : ३ वर्ष | प्रवेश क्षमता : ६०

पात्रता : १२ वी पास (सायन्स, एमसीव्हीसी)



## : वैशिष्ट्ये :

- अनुभवी उच्चशिक्षित प्राध्यापक वृंद
- पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट मार्गदर्शन
- आधुनिक (P-4) ४० कॉम्प्युटरची लॅब
- प्रत्येक विद्यार्थ्यास प्रॅक्टीससाठी स्वतंत्र कॉम्प्युटर
- विद्यार्थ्यांसाठी २४ तास इंटरनेटची सुविधा
- विद्यार्थ्यांसाठी कमवा आणि शिका योजना
- एस.सी.प्रवर्गातील विद्यार्थ्यांना फी मध्ये १००% सवलत
- सुसज्ज ग्रंथालय
- इन्व्हर्टर व जनरेटरची सोय

# श्री शिवाजी महाविद्यालय, परंडा.



पोलीस स्टेशन पाठीमागे, परंडा, ता. परंडा, जि. उस्मानाबाद.

Mo. 9922550242, ☎ : 02477 - 232425

अधिक माहितीसाठी www.ssmprd.com या संकेत स्थळावरती भेट द्या.



**शिवश्री गोरख मोरजकर**
संस्थापक/अध्यक्ष
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, परंडा.



**शिवमती आशाताई मोरजकर**
सचिव
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, परंडा.



GLOBAL EDUCATIONAL INSTITUTE PARANDA.

## आपल्याला शिक्षण आणि संस्कार फक्त ग्लोबल मध्येच मिळतील.....

### ग्लोबल विद्यालय (सेमी)

- नर्सरी
- ज्यु. केजी,
- सि.केजी.
- इ. १ ली ते १० वी.

### ग्लोबल इंग्लिश स्कूल

- नर्सरी
- ज्यु. केजी,
- सि.केजी.
- इ. १ ली ते ५ वी.

### ग्लोबल ज्युनिअर कॉलेज

इ. ११ वी ते १२ वी

- क्रॉप सायन्स
- कॉम्प्युटर सायन्स

**GLOBAL Foundation Courses**
6th 7th 8th 9th
NEET / IIT-JEE / MHT-CET

### : वैशिष्ट्ये :

१) शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव.
२) विद्यार्थी, पालक व समाजामध्ये लोकप्रियता
३) विज्ञान शाखेसाठी सुसज्य प्रयोग शाळा
४) साहित्य, कला व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन
५) व्यवसायिक शिक्षणाची सोय
६) व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न
७) दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षण
८) निसर्गरम्य शैक्षणिक वातावरण
९) उच्चशिक्षित व अनुभवी शिक्षक वृंद
१०) पाल्यांच्या प्रगतीबाबत पालकांशी सातत्याने संवाद
११) मैदानी खेळाची सुविधा
१२) विद्यार्थी मुल्यमापनासाठी परीक्षेचे आयोजन
१३) प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष
१४) सुसज्य ग्रंथालय व कॉम्प्युटर लॅब

# ग्लोबल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट